RIS Discussion Paper Series

आरआईएस चर्चा पत्र मालिका

# International Discussions on Indigenous People and India

# भारताचे मूळ निवासी आणि आंतरराष्ट्रीय संदर्भ

टी.सी. जेम्स

Discussion Paper # 272

चर्चा पत्र # 272

RIS
Research and Information System for Developing Countries
विकासशील देशों की अनुसंधान एवं सूचना प्रणाली

# भारताचे मूळ निवासी आणि आंतरराष्ट्रीय संदर्भ

## टी. सी. जेम्स

आर.आई.एस. - चर्चा पत्र # 272

जानेवारी 2022

RIS
Research and Information System for Developing Countries
विकासशील देशों की अनुसंधान एवं सूचना प्रणाली

कोर IV B, फोर्थ फ्लोर, इंडिया हेबिटेड सेंटर,
लोधी मार्ग, नई दिल्ली-110003 (भारत )
दूरभाष 91-11-24682177–80, फेक्स 91-11-24682173-74,
ईमेल: dgoffice@ris.org.in

आर.आई.एस. चे चर्चा पत्र संशोधनाच्या त्या प्राथमिक निष्कर्षाच्या प्रचाराच्या उद्देश्याने प्रकाशित केले जातात, जे संस्थांनाच्या कार्याचा किंवा कार्यक्रमांचा भाग म्हणून किंवा त्याच्याशी संबंधित संशोधनातून तयार होतात. या संबंधात आपले अभिप्राय पुढील पत्त्या वर पाठविता येतील: ईमेल-dgoffice@ris.org.in आर.आई. एस. चर्चा पत्र www.ris.org.in वर उपलब्ध आहेत.

# भारताचे मूळ निवासी आणि आंतरराष्ट्रीय संदर्भ

टी. सी. जेम्स*

गोषवारा: जैविक संसाधनांच्या सतत विकासात अनुसूचित जमातींचे विशिष्ठ योगदान आहे. हीच विविध आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर, जैविक संसाधन, पारंपरिक ज्ञान आणि जमातींना त्यांचे अधिकार आणि लाभ उपलब्ध करून देण्या संबंधात होणाऱ्या चर्चेत भारताची प्रमुख भूमिका राहिलेली आहे. पण जेंव्हा या संबंधात काही बाह्य मुद्दे ऐरणीवर येतात तेंव्हा भारताला विशेष सावधगिरी बाळगणे गरजेचे असते. संयुक्त राष्ट्रसंघा द्वारे 2007 मध्ये प्रकाशित मूळ निवासींच्या अधिकारा संबंधी घोषणा पत्रावर भारताचे आक्षेप तसेच त्याच्या द्वारे आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या मूळ निवासी आणि अनुसूचित जमातींच्या जनसंख्या संमेलनात 1989 मध्ये घेतलेल्या निर्णयांना मान्यता न देण्याची अकादमिक आणि नितीनिर्धारकांच्या वर्तुळात खूप चर्चा झाली. या प्रबंधात आंतरराष्ट्रीय करारां मध्ये मूळ निवासी शब्दाच्या प्रयोगाचा शोध घेतला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय आणि आंतरिक चर्चेत या संबंधात भारताच्या भूमिकेवर सुध्दा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या प्रबंधात भारताच्या जनगणनेची कागदपत्रे, संविधान सभेच्या चर्चा आणि अन्य आधिकारिक कागद पत्रांच्या आधारे मूळनिवासी शब्दाचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रपत्रात भारतातील अनुसूचित जमातींच्या विकासाचे विविध पैलू सुध्दा उलगडण्याचा थोडक्यात प्रयत्न केला आहे.

मुख्य शब्द :- मूळ निवासी, घटना, अधिकार, अनुसूचित जमाती, पारंपरिक ज्ञान.

## परिचय

मूळ निवासींच्या संबंधात आंतरराष्ट्रीय कार्य समूह (आई. डब्ल्यू.जी.आई.ए.) ने आपल्या वेब साईट वर केलेल्या टिप्पणीत म्हंटले आहे :

"भारताने मूळ निवासिंच्या अधिकारांच्या संबंधात संयुक्त राष्ट्र घोषणेच्या पक्षात या अटी वर मतदान केले होते की स्वातंत्र्या नंतर सर्व भारतीय मूळ निवासी आहेत"[1]

* वजिटिगि फेलो, आर.आई.एस. हे प्रपत्र आर.आई.एस. चे महानदिशक प्रो.सचनि चतुर्वेदी यांच्या पुढाकारा वनिा शक्य झाले नसते. त्यांच्याशी झालेली चर्चा आणि प्रारंभकि मसुद्यावर त्यांचे अभमित यासाठी खूप उपयोगी ठरले आहे. काही अन्य लोकांशी झालेली चर्चा आणि विचार वमिर्श सुधूदा या प्रपत्रा साठी उपयोगी ठरले आहेत. यात प्रमुख आहेत श्री हर्ष चौहान, अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचति जमाती आयोग, ज्यांनी याविषयावर विस्तृत चर्चा करून खूप नवीन माहिती दलिी. लेखक त्या सर्वांचा आभारी आहे. वचिार व्यक्तिगत आहेत.

या संबंधात भारताच्या भावने बद्दल काही क्षेत्रात, भारत मागासवर्गीय लोकांच्या प्रगतीच्या विरोधात असल्याची टीका करण्यात आली. ही टीका भारतीय पृष्ठभूमिच्या अपर्याप्त माहितीवर आधारित आहे. ह्या प्रपत्रात भारताच्या व्यापक भूमिके वर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर या विषयाशी निगडीत असलेल्या जैव विविधता, पारंपरिक ज्ञान, पारंपरिक चिकित्सा प्रणाली, आणि बौद्धिक संपदा अधिकारां सारख्या विषयांवर नेहमीच सक्रिय आणि सकारात्मक भूमिका पार पाडली आहे. भारताने यात सामील असलेल्या लोकां आणि समुदायांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय कायदेशीर साधनांच्या निर्मितीत सुध्दा महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. भारत त्या मोजक्या देशांपैकी एक आहे ज्यांनी जैव विविधता संबंधी आंतरराष्ट्रीय करार लागू होण्या पूर्वीच आनुवंशिक संसाधन आणि संबद्ध पारंपरिक ज्ञाना साठी स्वदेशी संधी आणि लाभ वाटप तंत्र विकसित करून आंतर राष्ट्रीय कराराच्या निर्मिती साठी पूर्व सहमती दिली होती. (चतुर्वेदी:2007). विकासशील देशांची अनुसंधान आणि माहिती प्रणाली (आर.आई.एस.) सारख्या संस्थां सहित अनेक भारतीय शिक्षणतज्ञ सुध्दा जैविक संसाधन आणि पारंपरिक ज्ञानाच्या संरक्षणा साठी तसेच या ज्ञानधारकांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी प्रयत्नशील होते.[2] भारत मानवाधिकारां संबंधी जागतिक घोषणा (1957) चा सुध्दा हस्ताक्षरकर्ता आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर या संबंधात सुध्दा भारताची भूमिका नेहमी आपल्या संस्कृती आणि लोकाचारावर आधारित राहिली असून त्यात विकासशील देशांच्या हिताचा सूक्ष्म विचार पण असतो.

मानवाधिकारां संबंधी चर्चांमध्ये वेग वेगळया स्थितीतील लोकांच्या संदर्भात वेग वेगळे ऐतिहासिक, सामाजिक किंवा आर्थिक प्रश्न उभे केले जात असतात. असाच एक प्रश्न 'मूळ निवासी 'हा सुद्धा आहे. संयुक्त राष्ट्र संघा द्वारे ह्या शब्दाचा आधिकारिक प्रयोग सर्व प्रथम आपल्या ''शाश्वत विकासा साठी वैश्विक शिखर संमेलन 2002 ''[3] च्या राजनैतिक घोषणापत्रात केला होता. तसे पाहिले तर संयुक्त राष्ट्र संघाने मूळ निवासी या विषयावर कार्य करण्या साठी एका कार्य दलाची निर्मिती 1982 मध्येच केली होती. पीटर्स आणि मिका(2017) च्या मतानुसार त्यापूर्वी हा शब्द राष्ट्रसंघाच्या आधिकारिक कागद पत्रात प्रयुक्त होण्या साठी चर्चेत होता.[4] वर उल्लेखित संमेलनाच्या कागदपत्रात जे संयुक्त राष्ट्रसंघा द्वारे प्रकाशित झाले आहेत, मूळ निवासी हा शब्द 173 वेळा प्रयुक्त झाला आहे. भलेही सर्व ठिकाणी तो लोक या शब्दा साठी प्रयुक्त झाला नसेल.[5] 'मूळ निवासी लोक 'या शब्दा शिवाय सुध्दा मूळ निवासी चे अनेक अर्थ आहेत. या शब्दाचा शब्दकोशीय अर्थ, 'कोणा विशिष्ठ स्थानी स्वाभाविक रूपे उत्पन्न किंवा घटित होणे असा आहे.' मूळ या शब्दाची उत्पत्ती 17 व्या शतकाच्या मध्यात झाल्याचे आढळते.[6] इंग्रजी शब्द indigenous ची उत्पत्ती लेटीन शब्द indigena पासून झाली आहे.

ज्याचा अर्थ आहे, 'आतून उत्पन्न होणारा '( पिल्लई 2014). हा शब्द 'इंडिजीन 'म्हणून 16 व्या शतकाच्या शेवटी पाहण्यास मिळतो.[7] सर थॉमस ब्राऊन यांनी 1646 मध्ये प्रकाशित '*Pseudodoxia Epidemica*' या आपल्या पुस्तकात अमेरिकेच्या मूळ निवासींच्या संदर्भात याचा प्रयोग पुढील प्रमाणे केला होता, " जरी आज त्याच्या अनेक भागात स्पेन च्या अधीन सेवा करणारे निग्रो लोकांचे समूह असले, तरी ते सर्व कोलंबस च्या शोधा नंतर आफ्रिकेहून तेथे आणले गेले होते. आणि ते अमेरिकेचे स्वदेशी किंवा मूळ निवासी **(Indigenous)** नाहीत" [8] (या शब्दावर भर दिलेला आहे).

असे दिसून येते की हा शब्द 20 व्या शतकाच्या सुरुवाती पासूनच व्यापक अकादमिक चर्चेत प्रयुक्त होत आला आहे, मुख्यतः मेक्सिकन क्रांती (1910-20) नंतर त्याचा प्रयोग वाढला. त्या मुळे अशा लोकांकडे बघण्याच्या वसाहतवादी धारणेत बदलाव सुरू झाला, ज्यांना वसाहतवादी लोकांनी सशस्त्र हिंसाचाराने आपल्या अधीन करून घेतले होते. आणि त्यांच्या भूमी वरून त्यांना बेदखल केले होते. हे सर्व उत्तर आणि दक्षिण अमेरिका तसेच आस्ट्रेलिया आणि न्युझीलंड येथे झाले. तेथील मूळ निवासी पूर्णपणे उध्वस्त केले गेले. या मूळ निवासिंना दूरस्थ स्थानी स्थानबद्ध होऊन राहण्यास बाध्य केले गेले आणि त्यांचे राजनीतिक आणि आर्थिक हक्क हिरावून घेतले गेले. अशा मेस्टिजोंची संख्या खूप मोठी असून देखील त्यांची दखल घेतली जात नव्हती. या क्षेत्रात इतिहास फक्त वसाहतवादी शक्तिंचाच होता.[9]

उशिरा का होईना पण 20 व्या शतकाच्या सुरुवाती पासून विद्वान या विषयावर बोलू लागले की युरोपियन लोकांच्या तेथे जाण्या पूर्वी सुध्दा अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि न्युझीलंड येथे लोक राहत होते आणि त्यांची स्वतःची संस्कृती आणि जीवनपद्धती होती. या क्षेत्रात राहणारे पूर्वीचे लोक तेथील 'मूळनिवासी 'होते. (बेटील:1998) संपूर्ण इतिहास खोडण्याचा हा प्रयत्न भारत, इंडोनेशिया, श्रीलंका इत्यादि आशियाई देशात जे सुध्दा वसाहत वाद्यांच्या विळख्यात होते, इतक्या मोठ्या प्रमाणात शक्य झाला नाही. लोकांचा मूळ रंग बदलला नाही, जसे संयुक्त राष्ट्रसंघात इंडोनेशियाच्या प्रतिनिधी ने म्हंटले की, " वसाहतवादींच्या काळात सुध्दा इंडोनेशिया ची संपूर्ण जनसंख्या अपरिवर्तीत राहिली." [10] कारण तेथे असा कोणताही सामूहिक नरसंहार किंवा मोठ्या प्रमाणात स्थाई स्थलांतरण झाले नाही जेणेकरून तेथील बहुसंख्यक लोकांच्या संख्येत कमी झाली असती. म्हणून तेथील जनसंख्येचे मूळ निवासी आणि गैर मूळ नीवासी असे विभाजन झाले नाही. तरी ही सामान्यतः जसे आंतरराष्ट्रीय चर्चेत होते, औद्योगिक पाश्चात्य देशां द्वारे प्रयुक्त केली जाणारी शब्दावली जशी च्या तशी आशियाई आणि आफ्रिकी देशांच्या इतिहासावर सुध्दा चिटकवून टाकण्यात येत असते. अश्या चर्चेत हे तथ्य सोयीस्कर पणे विसरले जाते की भारता सारख्या देशात शेवटी सत्ता मूळनिवासी कडे हस्तांतरित झाली होती. पण अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशात तेथे स्थलांतरित होणाऱ्या लोकांची संख्या मूळनिवासी पेक्षा खूप

अधिक होती आणि त्यांनी आपल्या पूर्व वसाहतवादी शासकां कडून परस्पर राजनीतिक सत्ता मिळवली होती. तसे पाहिले तर ते युरोपियन शासकां कडून स्थानीय निवासिंना सत्तेचे हस्तांतरण होते पण ते स्थानीय लोक त्याच जातीचे होते ज्यांनी युरोप मधून येऊन तेथे वसाहत निर्माण केली होती. या राजनीतिक सत्तेत त्यांना भागीदारी दिली गेली नव्हती जे वसाहत निर्मितीच्या पूर्वी पासून येथे राहत होते. दक्षिण आफ्रिके सारख्या काही आफ्रिकी देशात जेथे वसाहतवादी सुध्दा तेथील निवासी झाले होते. तेथे मूळ निवासींना आपल्या आधीन तर ठेवले होते पण त्यांचे उत्तर अमेरिके सारखे सामूहिक उन्मुलन मात्र झाले नव्हते. दक्षिण आफ्रिकेत ब्रिटिशांनी 1934 नंतर स्थानीय श्वेत वर्णीयांना स्वशासन दिले पण त्यांनी तेथे रंगभेदाच्या नितीचे अनुसरण केले. म्हणून तेथील अश्वेत आफ्रिकन लोकांना जे तेथील मूळ निवासी असून त्यांची जनसंख्या दक्षिण आफ्रिकेच्या एकूण जनसंख्येचा 80 टक्के होती, त्यांना आपल्या राजनीतिक अधिकारां साठी दीर्घ संघर्ष करावा लागला. जो 1994 मध्ये पूर्ण होऊन त्यांना सत्ता मिळाली. या वरून हे स्पष्ट होते की मूळ निवासी समस्ये चे मुळ मुख्यतः राजनीतिक शक्तीशी निगडित आहे, ही समस्या फक्त तेथेच असते जेथे सत्तेत त्या लोकांना भागीदारी दिली जात नाही जे वसाहतवादी सत्ता स्थापने पुर्वी तेथील मूळ निवासी असतात. भारता सारख्या देशांची परिस्थिती वेगळी आहे. म्हणून मूळ आणि बाहेरून येणाऱ्या लोकांचे असे विभाजन भारता सारख्या देशात मान्य नाही. देशातील अनुसूचित जमातींना ‘आदिवासी ‘किंवा ‘मूळ निवासी ‘म्हणणे म्हणजे बाकीच्या सर्व निवासिंना विदेशी म्हणण्या सारखे आहे. भारता सारख्या देशाच्या संबंधात हा शब्द प्रयोग बरोबर नाही. म्हणून संयुक्त राष्ट्र संघातील चर्चेत भारत फार पूर्वी पासून हा विचार प्रतिपादित करीत आला आहे की भारतातील सर्व निवासी येथील मूळ निवासीच आहेत.

## संयुक्त राष्ट्रसंघ आणि अन्य व्यासपीठांवर भारत

13 सप्टेंबर 2007 रोजी आयोजित संयुक्त राष्ट्रसंघाच्या 107 व्या पूर्ण बैठकीत एका प्रस्तावाने 11 द्वारे मूळ निवासी लोकांच्या अधिकारांसाठी एक घोषणा पत्र स्वीकृत झाले. ही एक गैर बाध्यकारी प्रस्तावना आहे. 143 देशांनी याच्या पक्षात मतदान केले तर 4 देशांनी, (अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, आणि न्युझीलंड) यांनी त्याच्या विरोधात. 11 देश मतदानात गैरहजर राहिले. 12 भारताचे शेजारी राष्ट्र भूतान आणि बांगलादेश सुध्दा मतदानात गैर हजर देशात सामील होते.

जरी भारताने या घोषणेच्या पक्षात मतदान केले असले तरी, राष्ट्र संघात भारताचे प्रतिनिधी श्री अजय मल्होत्रा यांनी भारताचे सर्व मूळ निवासी कोण आहेत यावर एक पात्रता वक्तव्य देताना सांगितले की:

*जरी या घोषणेत हे परिभाषित केलेले नाही की मूळ निवासिंचे घटनात्मक स्वरूप काय आहे. लोकहो, मूळ निवासिंच्या अधिकाराचा विषय हा स्वतंत्र देशातील अश्या लोकांशी संबंधित आहे, जे लोक देशात वसाहत निर्मिती नंतर येऊन स्थायिक होणाऱ्या लोकां पेक्षा आपल्या वंश, पंथ, किंवा परंपरे ने वेगळे असून वसाहतवादी लोकांच्या आक्रमणाच्या फार पूर्वी पासून त्या देशात किंवा त्याच्या विशिष्ठ भौगोलिक क्षेत्रात स्थायिक असतात. आणि कायदेशीर स्थिती काही ही असली तरी जे आपल्या काही किंवा सर्व पारंपरिक सामाजिक, आर्थिक, राजनीतिक आणि सांस्कृतिक संस्थांचे अस्तित्व टिकवून ठेवतात [13].*

भारत या प्रस्तावनेतील आत्मनिर्णया संबंधी धारेशी पण निगडीत होता. त्या बाबद भारताच्या प्रतिनिधी ने म्हंटले:

*आत्मनिर्णयाच्या अधिकारा बद्दल आमचा समज होता की आत्मनिर्णयाचा अधिकार फक्त विदेशी प्रभुत्वाच्या आधीन असलेल्या लोकांनाच लागू होतो. ही संकल्पना स्वतंत्र आणि संप्रभू राज्यातील लोकांना किंवा देशातील एका वर्गाला लागू होत नाही. हे राष्ट्रीय अखंडते चे सार आहे. घोषणेंत हे स्पष्ट केले गेले आहे की मूळ निवासिंना त्यांच्या आंतरिक आणि स्थानीय व्यवहाराच्या बाबतीत स्वायत्तता आणि स्वशासनाच्या अधिकारा बरोबरच त्यांच्या स्वायत्त कार्याच्या वित्तपोषणाच्या साधन आणि प्रक्रिये संबंधात सुध्दा आत्मनिर्णयाच्या अधिकाराचा प्रयोग करता येईल. या शिवाय धारा 46 मध्ये हे सुध्दा स्पष्ट केले गेले आहे की घोषणें मधील कशाचाही वापर, कोणत्याही राज्य, लोक, समूह, किंवा व्यक्तीला कोणत्याही गतिविधित सामील होण्यासाठी किंवा घोषणापत्राच्या विपरीत कार्य करण्याचा अधिकार म्हणून करता येणार नाही. म्हणूनच भारताने घोषणापत्राला स्वीकारण्याच्या पक्षात मतदान केले होते [14].*

मूळ निवासी शब्दाचा प्रयोग 1957 मध्ये सर्वप्रथम कोणा आंतरराष्ट्रीय संघटनेच्या विचार विनिमय आणि उपकरणात, मूळ निवासिंच्या संरक्षण आणि एकिकरणा संबंधित, आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आई.एल.ओ.) द्वारे आयोजित स्वतंत्र देशांच्या मूळ निवासी आणि अन्य जमाती आणि अर्ध जमाती जनसंख्या (संमेलन क्र.107) संमेलनातील चर्चेत झाला.(xaxa 3590). तरी असे वाटते की भारताने त्यावेळी मूळ निवासी शब्दावर कोणताही आक्षेप घेतला नाही किंवा चेतावणी पण दिली नाही.कारण त्या वेळी या शब्दाला अधिकार किंवा सशक्तीकरणाशी जोडले नव्हते. तेंव्हा फक्त मूळ निवासी आणि जमातींना विस्तृत सामाजिक व्यवस्थेत सामावण्यावर भर दिला गेला होता. पण जेंव्हा मुद्दे बदलले तेंव्हा भारताला भारतीय संदर्भात या शब्दाच्या प्रासंगिकतेच्या

स्पष्टीकरणाची गरज भासली. (xaxa3591) भारताने अजून 1989 संमेलनाची पुष्टी केलेली नाही. तो अजून 1957 च्या संमेलनालाच मान्यता देतो ज्याची त्याने 21 सप्टेंबर 1958 रोजी पुष्टी केली होती. तसे पाहिले तर अजून फक्त नेपाळ आणि मध्य आफ्रिकी गणराज्य या दोन देशांनीच 1989 च्या संमेलनाची पुष्टि केली आहे. विचार विनिमयात भारतीय प्रतिनिधी ने परत सांगितले की :

> *"भारताच्या अनुसूचित जमातीच्या लोकांची तुलना त्यांच्या समस्या, हित, आणि अधिकाराच्या बाबतीत काही अन्य देशांच्या मूळ निवासी जनसंख्येशी होऊ शकत नाही. म्हणून यात सामील काही जटील आणि संवेदनशील मुद्दयां बाबद आंतरराष्ट्रीय मानक स्थापित करण्याचा प्रयत्न प्रतिकूल परिणाम देऊ शकतो "*[15].

चीन, बांगला देश, म्यांमार आणि इंडोनेशिया सारख्या अन्य एशियाई देशांनी सुध्दा या शब्दाचा वैचारिक दृष्टिकोनातून 'मूळ ' या शब्दावर आक्षेप घेतला आहे. त्यांचा ही सामान्यतः हाच दृष्टिकोन होता की 'मूळ निवासी ' ही अवधारणा " पूर्णपणे युरोपियन वसाहतीचा स्वाभाविक दुषपरिणाम असून त्याला जशा च्या तशा एशियातील त्या देशांमध्ये लागू करणे ज्यांच्यावर युरोपियन वसाहतीचा इतका प्रभाव झालेला नाही पूर्ण पणे चुकीचे आहे" [16]. या दृष्टी ने एक तर सर्व निवासी त्या देशाचे मूळनिवासी आहेत किंवा मग संमेलनाच्या संकल्पने प्रमाणे कोणीही मूळनिवासी नाही. आफ्रिकी देशांचे मत होते की, तांत्रिक दृष्टिकोनातून सर्वच आफ्रिकन लोकांना मूळनिवासी मानले जावे कारण ते त्या लोकांचे वंशज आहेत जे युरोपियन वसाहत स्थापने पूर्वी तेथील निवासी होते [17]. त्यांच्या मते अश्या शब्दांच्या प्रयोगाने, या खंडात वर्षानुवर्षे गुणा गोविंदाने नांदणाऱ्या लोकात कलह निर्माण होईल आणि नव - स्वतंत्र देशांच्या एकिकरणात अवरोध निर्माण होईल.

## संयुक्त राष्ट्रसंघ आणि अन्य आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये मूळनिवासीची व्याख्या.

असे अनेक आंतरराष्ट्रीय संमेलन आणि करार आहेत[18] ज्यानुसार मूळनिवासीच्या अधिकार आणि विकासा साठी कार्य होत आहे. पण अजूनही जगभरात स्वीकार्य अशी त्यांची व्याख्या तयार झालेली नाही. संयुक्त राष्ट्रसंघाचा आर्थिक आणि सामाजिक विभाग आपल्या वेबसाईटवर मूळनिवासी लोकांना " अद्वितीय संस्कृतीचे वारसदार, निसर्ग आणि माणुसकीचे संरक्षक म्हणून वाखाणतो. तसेच त्यांनी ज्याप्रकारे आपल्या विशिष्ठ सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, आणि राजनीतिक परंपरा आजच्या वेगळया आणि प्रबळ समाज रचनेत सुध्दा [19], जतन करून ठेवल्या आहेत त्याची प्रशंसा पण करतो. पण यास स्वदेशी लोकांची किंवा मूळ निवासीची औपचारिक व्याख्या म्हणता येणार नाही. कारण ऐतिहासिक दृष्टीकोनाने यात विशिष्टतेचा अभाव आहे. ही

व्याख्या विशिष्ठ संस्कृती किंवा सामाजिक, आर्थिक आणि राजनीतिक विशेषता असणाऱ्या कोणत्याही समाजावर लागू होऊ शकते.

2007 च्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रस्ताव संख्या 61/295 मध्ये मूळ निवासी लोकांची कोणतीही व्याख्या नव्हती. परंतु एका रिपोर्ट मध्ये (मूळ निवासिंच्या लोकसंख्ये विरूध्द भेदभावाच्या समस्या, भेदभाव रोखणे आणि अल्पसंख्यकांच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्र उप आयोग, 1981 चे विशेष प्रतिवेदक जोस आर. मार्टिनेज कोबो यांचे अध्ययन) जे संयुक्त राष्ट्र संघाच्या चर्चेचा विषय झाले होते, त्यात मूळ निवासी लोकांची संकल्पना खालील प्रमाणे सांगितली होती:

मूळ निवासी समुदाय, लोक आणि राष्ट्र ते आहेत जे आक्रमणाच्या आणि वसाहत स्थापनेच्या पूर्वीच्या समाजा बरोबर एक ऐतिहासिक निरंतरता ठेऊन आपल्या क्षेत्रात विकसित होतात आणि त्या क्षेत्रात किंवा त्याच्या काही भागात वर्तमान काळात प्रभावी असलेल्या समाजाच्या इतर घटकांपेक्षा आपले वेगळे अस्तित्व जपतात. ते वर्तमान काळात समाजात अप्रभावी घटक म्हणून विद्यमान असून आपल्या सांस्कृतिक परंपरा, सामाजिक संस्था आणि न्यायिक परंपरेनुसार आपले अस्तित्व निरंतर टिकवून ठेवून, आपल्या पूर्वजांचे क्षेत्र, आणि त्यांच्या जातीय ओळखीला सुरक्षित ठेवून, विकसित करण्यास आणि ती पुढच्या पिढी पर्यंत नेण्या साठी संकल्पित असतात[20].

रिपोर्ट मध्ये लिहिले आहे की कोणत्या कारकांच्या आधारावर ऐतिहासिक निरंतरता ठरविली गेली पाहिजे. ते आहेत :

- पैतृक भूमी कवि‍ा तच्यिा भागावर ताबा.
- या भूमीच्या मूळ नविासयिां समवेत समान आनुवांशकिता.
- सामान्य रूपे संस्कृती कवि‍ा तच्यिा वशिष्िठ अभव्यिक्तीत ( जसा धर्म, एक जमातीच्या व्यवस्थे प्रमाणे राहणे, मूळनविासी समुदायाची सदस्यता, परधिान, आजीवकिे चे साधन, जीवन शैली इत्यादी)
- भाषा (भले फक्त एका भाषेच्या रुपात, कवि‍ा मातृभाषेच्या रुपात, घरी कवि‍ा कुटुंबात संवादाच्या सवयीच्या साधनाच्या रुपात, कवि‍ा मुख्य, आवडीच्या, सवयीच्या, सर्वांच्या सामान्य भाषेच्या रुपात).
- देशाच्या काहीं भागात कवि‍ा जगाच्या काही क्षेत्रात नविास.
- अन्य प्रासंगकि कारक [21].

वशिष्ठि क्षेत्रात वसाहत कायम होण्यापूर्वी सतत अस्तत्विा शविाय, हे दोन प्रमुख अतरिक्ति कारक सुध्दा आहेत जसे समाजात प्रभुत्व नसणे आणि काही वैशष्ठि्य असणे. ही तत्वे त्या लोकांना मूळनविासींच्या श्रेणीत सामील करण्यास मदत करतात जे पक्षपाताचे बळी आणि राजनीतकि सत्ते पासून वंचति असतात. हे घटक मानव अधकिाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. पण कदाचति अन्य परस्थितीत नाही. जरी या वधिाना मुळे आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मूळनविासींच्या संकल्पने संबंधी चर्चेत स्पष्टता आणण्याचा प्रयत्न झाला पण भारताच्या बाबतीत मात्र यामुळे अधकि गुंतागुंत निर्माण झाली आहे. हे पैतृक भूमीवर ताबा असण्याच्या पहलि्या कारका पासून काही भागावर नविास करण्या पर्यंत वस्तृत आहे. भारत जगाचे सूक्ष्म स्वरूप आहे. आमच्या कडे वेग वेगळ्या भाषा बोलणारे, वेग वेगळ्या पंथांचे पालन करणारे, वेग वेगळ्या चाली रीतींचे पालन करणारे, वेग वेगळे व्यवसाय आणि वेग वेगळ्या वंशांशी संबंध असणारे लोक आहेत. भारतातील मानव अधकिारांचे प्रश्न फक्त ‘मूळनविासी ‘आणि ‘वदिेशी ‘यांच्या पुरते मर्यादति नसून अधकि व्यापक आहेत.

भाषा निश्चितच कोणत्याही समाजाचा महत्त्वाचा चिन्हक आहे. परंतु त्याबद्दल ही आम्हाला दिसून येते कि इंडो युरोपियन भाषा (76.89 टक्के लोकां द्वारे या गटाच्या 24 भाषा बोलल्या जातात). द्रविड 20.82 टक्के लोकां द्वारे या गटाच्या 17 भाषा बोलल्या जातात. ऑस्ट्रो - आशियाई (1.11 टक्के लोकां द्वारे या गटाच्या 14 भाषा बोलल्या जातात), तर तिबेटो - बर्मी 1 (एक टक्के लोकां द्वारे 1 भाषा बोलली जाते). ताई - कडई आणि ग्रेट अंड मानी भाषा परिवारांच्या भाषा बोलणारे लोक सुध्दा आहेत, भले ही ते अत्यल्प आहेत [22]. भारतीय घटनेच्या आठव्या अनुसूचित 22 भाषा सामील केल्या आहेत. हे भाषाई वैविध्य अनुसूचित जमातींच्या जनसंख्येत सुध्दा दिसून येते. विभिन्न जमाती ऑस्ट्रो - एशियाई (मोख्मर, मुंडली, संथाली इत्यादि), द्रविड (गोंडी आणि कुरुख बोली) आणि भारोपीय (भिल्लांची बोली) या भाषा परिवाराच्या भाषा बोलतात. आता जर भाषेवर आधारित वर्गीकरणाचीच ही स्थिती असेल, तर आम्ही भारताच्या जमाती आणि गैर - जमाती लोकांच्या जातीयतेचे बद्दल कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू शकत नाही. संस्कृत सारख्या अन्य अनेक प्राचीन भाषा सुध्दा आहेत ज्या भारताच्या ‘ पुरातन ‘ भाषा म्हंटल्या जातात[23]. पाली आणि प्राकृत सारख्या अन्य प्राचीन भाषा सुध्दा आहेत ज्या आजच्या काळात सामान्यतः बोलल्या जात नाहीत परंतु अभ्यास आणि धार्मिक कर्मकांडां साठी त्यांचा उपयोग केला जातो. त्या पैकी कित्येकांनी देशात आज बोलल्या जाणाऱ्या भाषांना जन्म दिला आहे. पण सामान्यतः त्या सर्वांना भारतीय भाषाच म्हंटले जाते. या भाषा मागील अनेक शतकात भारतातच जन्मल्या आणि विकसित झाल्या आहेत. भारतात ज्या भाषांना विदेशी म्हंटले जाते त्या आहेत इंग्रजी, फ्रेंच आणि पूर्तुगाली, ज्यांचा प्रवेश भारतात मुख्यतः वसाहतींच्या काळातच झाला. अरबी, रशियन, चिनी आणि जपानी सारख्या भाषा सुध्दा येथे आहेत ज्या त्या देशांच्या नावानेच ओळखल्या जातात आणि त्यांचा उद्भव आणि विकास सुध्दा त्याच देशात झाला आहे[24]. येथे

कोणत्याही भाषेला दडपण्याचा प्रश्नच उद्धवत नाही. जर एखाद्या व्यक्तीची मातृभाषा ती भाषा आहे जिचा उद्भव आणि विकास भारतातच झाला आहे, म्हणजे ती एक स्वदेशी भाषा आहे तर त्या माणसाला गैर मूळनिवासी कसे समजले जाऊ शकेल?

आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आई.एल.ओ.) ने 1957 मध्ये मूळनिवासी आणि जमातींच्या जनसंख्या सम्मेलन (क्र.107) ला लागू करून संयुक्त वाक्यांश ' मूळनिवासी आणि जमातींची जनसंख्या ' चा प्रयोग केला आहे. वर्तमान काळात सम्मेलन वर्ष 1989 (संख्या169)[25] चा करार लागू आहे. ह्या संमेलनात भलेही मूळ निवासी शब्दाची औपचारिक व्याख्या तयार झाली नसली तरी 1989 च्या कराराच्या अनुच्छेद 1 मध्ये म्हंटले आहे की हा करार निम्नलिखित लोकांवर लागू होईल:

- "(ए) स्वतंत्र देशातील आदविासी लोक ज्यांची सामाजकि, सांस्कृतकि आणि आर्थकि स्थति त्यांना राष्ट्रीय समुदायाच्या अन्य वर्गां पासून वेगळी करते आणि ज्यांची स्थती पूर्णतः कविा अंशतः आपल्या स्वतःच्या चाली - रीती, परंपरा, कविा वशिेष कायद्याने अथवा नयिमांनी नयिंत्रति होते.
- (बी) स्वतंत्र देशातील ते लोक जे आपल्या आनुवंशकिते मुळे देशात राहणाऱ्या लोकांत मूळ नविासी समजले जातात, कविा त्या भौगोलकि क्षेत्राशी ज्याच्याशी त्या देशाचा संबंध आहे, बाह्य वजिय कविा वसाहत स्थापना होण्याच्या वेळी कविा वर्तमान राज्याच्या सीमा स्थापने च्या वेळी, कायदेशीर स्थतीच्या नरिपेक्ष, स्वतःच्या सामाजकि, आर्थकि, सांस्कृतकि आणि राजनीतकि संस्थां पैकी काही कविा सर्वांना राखून ठेवतात 26.

या विवरणात कोबोच्या व्याख्येतील अधिकांश घटक सामील आहेत. ही व्याख्या लोकांना मूळनिवासी म्हणविण्यासाठी एक कालबध्द योग्यता प्रदान करते. अर्थात " विजय, वसाहत किंवा वर्तमान राज्याच्या सीमा स्थापन होण्याच्या वेळी ." यात वर्तमान देशाच्या निर्मिती किंवा वसाहत स्थापनेच्या वेळी ह्या अवधी आधारित योग्यता आहेत पण, पण काही समूहांना मूळनिवासीच्या रुपात वेगळे करणे आणि बाकीच्यांना पूर्वजांच्या वंशावळीतून बाहेर काढणे, जे समुदाय अवधी-चिन्हकाची अट पूर्ण करतात ते यावर आक्षेप घेऊ शकतात.

जागतिक बौद्धिक संपदा संघटना (WIPO) मागील दोन दशकां पासून एका आंतर - सरकारी समितिच्या माध्यमाने पारंपरिक ज्ञानाच्या संरक्षणासाठी एक संभवनीय कायदेशीर साधन निर्माण करण्याचा विचार करीत होती. या समितिच्या बैठकीत मूळनिवासिंचे प्रतिनिधीसुध्दा निरीक्षक म्हणून उपस्थित होते. जरी संघटने ने अजून ही या शब्दाची अधिकृत व्याख्या केलेली नाही. तरी पण विचारार्थ असलेल्या पारंपरिक ज्ञानाच्या संरक्षणाच्या कायदेशीर साधनाच्या एका मसुद्यात, समिती ने, मूळनिवासी शब्दाचा प्रयोग 'पारंपरिक ज्ञानाची' व्याख्या करताना केला आहे.

*पारंपरिक ज्ञानाचे तात्पर्य मूळनिवासी(लोक), स्थानीय समुदाय आणि /किंवा अन्य (लाभार्थी) कडून मिळनाऱ्या अश्या ज्ञानाशी आहे, जे गतिशील आणि विकसित असून बौद्धिक गतिविधि, अनुभव, आध्यात्मिक साधन, पारंपरिक संदर्भ किंवा अंतर्दृष्टी ने प्राप्त होते. याचा संबंध भूमी किंवा पर्यावरणाशी असून ज्यात त्याची माहिती, कौशल्य, नावीन्य, अभ्यास, शिक्षण किंवा शिकणे शिकवणे संमिलित असते.*[27]

कोष्ठकातील शब्दांवर आणि त्यांच्या भाव अभिव्यक्ती वर अजुन सर्वसंमती झालेली नाही. मूळनिवासी लोक या वाक्यांशातील ' लोक ' शब्द असाच विवादित होतो जेंव्हा त्याला मूळ हे विशेषण लावले जाते.

जागतिक स्वास्थ्य संघटना (WHO) ने सुध्दा निम्न लिखित शब्दात आरोग्य सेवेच्या तरतुदी च्या संदर्भात मूळ लोकसंख्या या वाक्यांशाची व्याख्या अश्या प्रकारे केली आहे: " असे समुदाय जे भौगोलिक रूपाने वेगळ्या पारंपरिक आवास किंवा पैतृक क्षेत्रात राहत, किंवा संबद्ध असतात आणि जे, वर्तमान राज्यांच्या निर्मिती आणि वर्तमान सीमा परिभाषित होण्याच्या पूर्वी त्या क्षेत्रात एका विशिष्ठ सांस्कृतिक समुहाचा भाग म्हणून राहणाऱ्या समूहाचे वंशज म्हणून स्वतःची ओळख ठेवतात. ते सामान्यतः स्वतःची सांस्कृतिक आणि सामाजिक ओळख आणि सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजनीतिक संस्थांना मुख्यधारा किंवा प्रभावी समाज आणि संस्कृती पेक्षा वेगळे ठेवतात.[28]

'मूळ निवासी 'च्या सोप्या व्याख्ये पैकी एक ही आहे की ते 'असे लोक आहेत, जे प्राचीन काळा पासून सर्व खंडांवर स्थायीक आहेत.[29] ते आपल्या भूमीवर निरंतर रहात आले आहेत. ते आपले सांस्कृतिक मूल्य जपून ठेवतात, पर्यावरणास अक्षुण्ण् ठेवून विकसित करत शतकानुशतके आपल्या परंपरा जिवंत ठेऊन आहेत.[30] ही व्याख्या राजकीय प्रभावाविना तयार झाली असून त्यात 'जमाती','समूह ''समुदाय 'सारख्या शब्दा चा प्रयोग न करण्याचे पथ्य पाळले आहे शिवाय यात सामील करण्या साठी कोणते ही कट ऑफ वर्ष किंवा अवधी निर्धारित केलेली नाही. फक्त एवढेच म्हंटले आहे की ते समुदाय तेथे खूप वर्षा पासून राहत असले पाहिजे.

## भारतीय जनसंख्या: ऐतिहासिक प्रवास

भारतात मागील काही शतकात मोठ्या प्रमाणात आप्रवासन [31] झालेले नाही. तिथी निर्धारणा साठी डी.एन.ए. चा उपयोग करणाच्या नवीनतम अभ्यासानुसार भारतात शेवटले मोठे आप्रवासन 1000 ईस्वीच्या [32] पूर्वी झाले होते. त्या पूर्वी वेग वेगळ्या वेळी आप्रवासनाच्या वेग वेगळ्या लाटा येत

होत्या. भारत सरकारच्या एका प्रपत्रात भारतात आप्रवासाच्या लाटांचे वर्णन अश्या प्रकारे केले आहे:

> *युरोपियन मूळच्या लोकांचा (संभवतः टोकोरियन लोक) विस्तार संभवतः 3800 वर्षा पूर्वी सुरू झाला. आणि संभवतः 1000 वर्षा (किंवा अधिक) ते प्रथम उरल्सच्या दक्षिणेत, काळया सागराच्या उत्तरेत आणि पूर्व कजाकिस्थानात भारोपीय भाषा बोलणारे पश्चिमी आणि पूर्व दिशे कडे निघाले आणि शेवटी दक्षिण दिशे कडे निघून गेले आणि (संभवतः) द्रविड किंवा दक्षिण एशीयाई क्षेत्राच्या अन्य मूळ निवासिंत मिसळून गेले.*[33]

त्यानंतर भारतात अन्य कोणाही लोकांचे आगमन झालेले नाही. तेंव्हा पासून आता पर्यंत देशाच्या अनेक भागात शासन व्यवस्था अनेकदा बदलली आहे. आपले शासन संपल्यावर देश सोडून जाणारे एकमेव शासक इंग्रजच होते. अन्य शासक भारतीय समाज आणि संस्कृतीत मिसळून गेले. जमाती सहित विभिन्न जाती आणि पंथाच्या लोकांनी देशाच्या लहान मोठ्या क्षेत्रात आपला दबदबा कायम केला. आस्थेचे बाहुल्य जमाती आणि गैर जमाती दोन्ही लोकांची सामान्य दशा आहे. अनेक शतकात भारतात एक विशिष्ठ मिश्रित संस्कृतीचा उदय झाला. ही एक अशी संस्कृती आहे जी एकता आणि विविधता प्रतिबिंबित करते.

पुरातत्त्वीय उत्तखन, मानववंश शास्त्र, भाषा विज्ञान, आणि अनुवांशिक अनुक्रमणावर आधारित वर्तमान अभ्यासात भारतात होमो सेपियन (नर जाती) च्या एका आणखी आप्रवासाची माहिती मिळाली आहे.[34] त्यांची पहिली लाट जवळ जवळ 70000 वर्षा पूर्वी आफ्रिकेतून भारतात आली आणि येथून पश्चिम एशिया, भारत, दक्षिण पूर्व एशिया आणि ऑस्ट्रेलिया कडे गेली. त्यांनी जवळ जवळ 65 हजार वर्षांपूर्वी भारतात प्रवेश केल्याचे संभवते. लिटिल अंदमानात ओंगे जमातीचे लोक, ज्यांची एकूण जनसंख्या आता 100 हून सुध्दा कमी राहिली आहे, या समूहाचे वंशज समजले जातात. त्यांची शारीरिक संरचना ऑस्ट्रेलियाच्या एबोरिजन आदिवासीं सारखी आहे. डेव्हिड रीच (2018) यांच्यानुसार हे लोक " युरोशियन मुख्यभुमीच्या लोकां पासून हजारो वर्षांपूर्वी वेगळे झाले होते."[35] तरी सुध्दा आनुवंशिकतेने तो आफ्रिकेतून बाहेर आलेल्या वर्तमान भारतीय लोकसंख्येच्या पायाचा पहिला समूह आहे. कारण आज तो आपल्या जिनोम व्यापी आनुवंशिकतेचा अर्ध्या ते दोनतृतीयांश भागाच्या मधला भाग याच समूहातून येतो जोसेफ (2018): " जवळ जवळ सर्व क्षेत्रात, सर्व भाषा समूह आणि देशाच्या सर्व जाती आणि जमातीत या पहिल्या भारतीयांच्या आनुवंशिकतेची छाप आहे जे शास्त्रीय अभ्यासात वारंवार दिसून आले आहे ". [36] आप्रवासाची दुसरी लाट इराणच्या जाग्रोस क्षेत्रातून आली होती ज्यात अधिकतर शेतकरी वर्गाचे होते. पश्चिमी युरेशियन लोकांचे भारतात पहिले आप्रवासन कास्य युगात (9000

ते 7000 वर्षा पूर्वी) किंवा त्यानंतर  झाले. युरेशियन लोक जे त्यांच्या पूर्वी भारतात असणाऱ्या लोकात मिसळून गेले होते, ते भारतात येण्यापूर्वी वेग वेगळ्या काळात युरेशियाच्या स्टेप्स भागात रहात होते. आप्रवासाची तिसरी लाट दक्षिणपूर्व एशियातून आली जी मुंडारी आणि खासी सारख्या आस्ट्रो-एशियाई भाषा आपल्या बरोबर घेऊन आली. भारतात आप्रवासाची शेवटची मोठी लाट 2000 ते 1000 ईस्वी पूर्व   (जोसेफ, 2018)   स्टेपच्या भारोपिय भाषा बोलणाऱ्या गुराख्यांची होती.

नरसिम्हन आणि अन्य (2018) यांच्या अनुसार, " वर्तमान पूर्वी आणि दक्षिण एशियाई लोकांच्या ( दक्षिणी एशियाई लोकात पश्चिम युरेशियन लोकांच्या मिश्रणा पूर्वी ) सर्व वंश पूर्वे कडील एका काल्पनिक वंशातून निघाले होते. ज्यांनी एका लहान कालावधीत, ए. ए. एस.आई. (दक्षिण भारतीयांचे प्राचीन पूर्वज) यांनी पूर्वी एशियाई, ओंगे, आणि ऑस्ट्रेलियाई लोकांकडे जाणाऱ्या वंशावळी ला जन्म दिला ".[37] 2019 च्या आपल्या प्रपत्रात नरसिंम्हन आणि इतर हे दर्शवतात की आधुनिक दक्षिण एशियाई लोकात वंशाचा प्राथमिक स्त्रोत इराण आणि दक्षिण पूर्व एशियाच्या सुरुवाती शिकारी - संग्रहकर्त्यांशी संबंधित लोकांच्या मध्ये एक प्रागैतिहासिक संबंध आहे.[38] डेव्हिड रीच (2018) ज्यांनी ह्याचा विस्तृत अभ्यास केला होता, त्यांना डी.एन.ए. च्या आधारावर भारतीय लोकसंख्येत दोन धारा मिळाल्या, एक पैतृक दक्षिण भारतीय (ए.एस.आई.) आणि पैतृक उत्तर भारतीय (ए.एन.आई.) [39] ज्यांच्या पासून वर्तमान लोकसंख्येची उत्पत्ती झाली आहे. त्यांच्या अभ्यासाचे हे फलित आहे की " भारताच्या मुख्यभुमी वर आज प्रत्येक माणूस पश्चिम युरेशियनच्या संबंधित वंशाचे मिश्रण आहे. भलेही वेगवेगळ्या अनुपात आणि वंशात. जे विविध पूर्वी एशियाई आणि दक्षिण एशियाई लोकसंख्येशी अधिक निकटतेने संबंधित आहे. भारतात कोणताही  समूह आनुवंशिक शुद्धतेचा दावा करू शकत नाही." (यावर जोर दिला आहे ).[40] हे मिश्रण 20 ते 80 टक्क्या पर्यंत आहे. रीचला दीसून आले की मुख्य भूमी वरील लोकांमधील कोणताही समूह मिश्रणा पासून प्रभावित नाही. न उच्चतम जाती न  निम्नतम जाती, यात जाती व्यवस्थेतून बाहेर असलेल्या गैर हिंदू आदिवासी लोकसंख्या सुध्दा सामील आहे ." [41] जसे त्रिपाठी आणि अन्य लोकांनी (2008) पाहिले होते, की भारतात जाती व्यवस्था फक्त 3000 - 5000 वर्ष जुनी आहे. आणि ही अवधी मानव विकास क्रमाच्या दृष्टीने खूप कमी, आता आताची आहे. म्हणून जाती व्यवस्थेचा भारतीय लोकसंख्येच्या आनुवंशिक पोती वर इतका सशक्त प्रभाव पडू शकत नाही. त्रिपाठीला हे पण दिसून आले की जाती आणि सामाजिक - सांस्कृतिक सीमेच्या पलीकडे जनन कोशिकांचा प्रवाह खूप अधिक मात्रेत आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, भौगोलिक अंतराचा सामाजिक - सांस्कृतिक पृष्ठभूमि पेक्षा फाईलोजेनेटिक संबंधांवर अधिक शक्तिशाली प्रभाव पडतो. पण अन्य माहितीच्या आधारावर त्रिपाठी आणि अन्यांनी द्रविड भाषी लोकांना भारतातील सर्वात जुने निवासी म्हणून प्रस्तावित केले ज्यांनी जवळ जवळ 10000 ते 15000 वर्षा पूर्वी भारतात प्रवेश केला. त्यांच्या अनुसार एक आणखी आप्रवासन अंदाजे 4000 वर्षांपूर्वी मध्य

एशियातील स्टेप मधून झालेले खेडूत भटक्यांचे होते जे आपल्या बरोबर भारोपिय भाषा घेऊन आले होते. या सर्व आनुवंशिकते वरून माहिती चे जे महत्त्वपूर्ण बिंदू समोर येतात त्यावरून असे कळतेकी भारतीय लोकसंख्या विभिन्न जीनांचे मिश्रण असून ते सर्व जाती जमातींच्या पार आहे.

जगातील सर्वात मोठ्या अश्या दुसऱ्या लोकसंख्येने, भारत विविध समूहाचे घर असून त्यांच्यात भिन्नता आहे. अश्या प्रकारच्या विविधता, भाषा, बोली, आणि रीति रिवाजात आणि सामाजिक प्रथांमध्ये असू शकतात. देशाच्या भौगोलिक विशेषतेने सुध्दा या विविधतेत भर टाकली आहे. काळानुसार हे समूह देशाच्या विभिन्न भागात वसले आणि स्वतःला विशिष्ठ बनवून घेतले. इतकेच नव्हे तर एक परिभाषित भौगोलिक क्षेत्रात सुध्दा कित्येकदा विभिन्न सांस्कृतिक आणि सामाजिक समूह दिसून येतात. त्यांचे आर्थिक आणि सामाजिक विकास सुध्दा वेगवेगळे असतात. देशाच्या स्वातंत्र्याच्या वेळी, सामाजिक आणि आर्थिक रूपाने मागासलेल्या समुहांच्या विकासावर लक्ष्य केंद्रित झाले आणि भारताच्या घटनेत त्यांच्या सामाजिक - आर्थिक विकासासाठी विशेष तरतुदी केल्या गेल्या.

## जनगणनेची कागदपत्रे

स्वातंत्र्याच्या खूप पूर्वी, भारतीय लोकांच्या झालेल्या वर्गीकरणाने सरकार साठी समस्या उभ्या केल्या आहेत, विशेषतः दशकीय जनगणनेसाठी. जी ब्रिटिश काळात सुरू झाली होती. कारण " सभ्यतेच्या सर्व चरणातील लोक भारतात आढळतात. " [42] 1872 च्या जनगणना हाऊस रजिस्टर मध्ये ' जाती किंवा वर्ग ' शब्द प्रयुक्त झाला होता आणि 'वंशा 'ची माहिती देणे पण आवश्यक होते. त्या जनगणनेत अश्या लोकांना आणि समूहांना संदर्भित करण्यासाठी' एबोरिजिनल ट्राइब्ज' सारख्या लेबल चा पण प्रयोग केला जे प्रमुख समुदायां पासून वेगळे राहत होते आणि त्यापैकी अनेक भटक्या किंवा अर्धभटक्या जीवनशैलीचे पालन करीत होते आणि ज्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक प्रथा आणि अनुष्ठान मुख्यधारे पासून वेगळे होते. जेंव्हाकी 1881 च्या जनगणनेत फक्त जातीचा उल्लेख होता वर्ग नव्हे आणि ते सुध्दा फक्त हिंदुसाठी, अन्य मजहबां च्या लोकांना जनगणना अनुसूचीनुसार फक्त संप्रदायाची माहिती देणे गरजेचे होते. 1891 च्या जनगणना अनुसूचित जाती आणि ' वंशा ' चे वर्गीकरण आणि धर्मा साठी संप्रदायाचा पण प्रयोग केला गेला.

जमातीला सुरुवातीला नीट परिभाषित केले गेले नव्हते. दास गुप्ता, संयुक्ता (2019) च्या अनुसार वसाहतीतील प्रशासनाने आपल्या तीन जनगणनांच्या अनुभवाच्या आधारे, 20 व्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत, एका जमातीची व्याख्या "एका सामान्य नावाच्या परिवारा किंवा परिवार समूहाच्या स्वरुपात करण्याचा उपक्रम केला जी नियमानुसार कोणता विशिष्ठ व्यवसाय करीत नव्हती. ते सामान्यतः एक पौराणिक किंवा ऐतिहासिक पूर्वज किंवा कधी कधी कधी कोणा

पशू पासून आपल्या वंशाची उत्पत्ती सांगतात. पण देशातील काही भागात ते नातेवाईकांच्या परंपरे पेक्षा रक्तपात युक्त संघर्षातील जबाबदारीच्या माध्यमाने संगठित होतात. हे सर्व सामान्यतः एकच भाषा बोलतात आणि देशाच्या एखाद्या भागावर आपले नियंत्रण ठेवतात किंवा त्यावर हक्क सांगतात. "[43] ते पुढे म्हणतात की "आवश्यक नाही की प्रत्येक जमात अंतर्विवाही असेल". यावरून असे वाटते की इंग्रजांनी जमातीत, वनवासी तसेच रानटी किंवा 'अर्ध रानटी ' लोकांना सुध्दा सामील केले होते ज्यात त्यांचा जागतिक श्वेत वर्णीय श्रेष्ठत्वाचा दृष्टिकोन दिसून येतो.

1901 च्या जनगणनेत, 'जमात ' शब्द जनगणना अनुसूचीच्या 8 व्या क्रमांकावर निम्न लिखित वर्गीकरण, " हिंदू आणि जैनांच्या जाती, जमाती किंवा अन्यांच्या जाती" मध्ये प्रविष्ठी होते. हे वर्गीकरण 1911 च्या जनगणनेत चालू राहिले. 1921,1931 आणि 1941 च्या जनगणनेत धर्माच्या उल्लेखाविना फक्त 'जाती जमाती किंवा वंशाचे ' वर्गीकरण केले गेले होते. 1951 च्या, स्वतंत्रते नंतरच्या पहिल्या जनगणनेत, 'विशेष समूह ' या शब्दाचा प्रयोग झाला होता आणि असम राज्यात सुध्दा, गणकां द्वारे लोकांना विचारला जाणारा एक प्रश्न हा होता की, " तुम्ही असमचे मूळनिवासी आहात का?" या प्रकरणात मूळ निवासी शब्द असम राज्या साठी विशिष्ठ होता पण सामान्यतः भारता साठी नाही. त्यावेळी संपूर्ण उत्तरपूर्व हा असम राज्याचा भाग होता आणि तेथे मोठ्या संख्येत जमाती होत्या ज्या राज्याच्या विभिन्न क्षेत्रात प्रभावी होत्या आणि पुढे जाऊन त्या राज्याच्या पुनर्गठनाच्या आधार झाल्या. 2061 ते 2011 पर्यंत देशात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या स्थितीची माहिती द्यावयाची होती. [44] यावरून कळून येते की जमातींना नवीन स्थाईक होणाऱ्या लोकांना मूळनिवासी लोकां पासून वेगळे करणारे समजले जात नाही. खरे तर, भारताच्या 2001 च्या जनगणनेच्या धर्मा संबंधी रिपोर्ट मध्ये मूळनिवासी शब्दाचा प्रयोग जमातींच्या आस्था आणि चालीरीतींच्या संदर्भात केला गेला होता. ज्या कोणत्याही प्रमुख पंथाचा भाग नव्हत्या.

## घटना सभेतील वादविवाद

घटना सभेतील वादविवादात (1946 -1949 ) मध्ये जमातींच्या विषय चर्चेत आला होता. श्री जयपाल सिंह, [45] तत्कालीन बिहार ( आता झारखंड ) मधून जमातींचे प्रवक्ते होते, ज्यांना विभिन्न रुपात मागासवर्गीय जमाती, आदिम जमाती, अपराधिक जमाती, आणि रानटी म्हंटले जात असे. त्यांचा तर्क होता की हे सिंधू घाटीचे लोक होते बाकीचे सर्व लोक घुसखोर आहेत. [46] त्यांनी वर्तमान झारखंड मधील रामगढ मध्ये 53 व्या अखिल भारतीय काँग्रेसच्या आयोजन समिती चे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद (घटना सभेचे अध्यक्ष) यांच्या एका अवलोकनाचा सुध्दा उल्लेख केला की तेथील लोक भारताचे मूळनिवासी म्हंटले जातात. [47] जयपाल सिंह यांनी त्यांच्या

साठी 'आदिबासीं 'किंवा' 'आदिवासी' या शब्दाला प्राथमिकता दिली. त्यांनी घटना सभेच्या अध्यक्षांना म्हंटले:

*"मला वाटते आपण आपल्या अनुवाद समितीला निर्देश द्यावा की अनुसूचित जमातींचा अनुवाद आदिवासी (अर्थात मूळ निवासी किंवा मूळ लोक) असा झाला पाहिजे. आदिवासी शब्दाची एक गरिमा आहे... का हा जुना अपशब्द बनजाती (वनवासी) प्रयोग केला जात आहे..."* [48]

तरी त्यांचा प्रस्ताव स्वीकार झाला नाही. घटना सभेचे एक अन्य सभासद श्री विश्वनाथ दास यांनी 'आदिवासी 'शब्दाला या आधारावर जोरदार विरोध केला की हा शब्द फुटीरतावादी प्रवृत्तींना प्रोत्साहन देतो. ते म्हणाले:

*"मी श्री ठक्कर बाप्पा यांना या दुर्भाग्यपूर्ण अभिव्यक्ती ' आदिवासी ' पासून देशाला वाचविण्याची विनंती केली आहे. जेंव्हा पर्यंत तुम्ही अश्या शब्दांना स्वीकार करता तेंव्हा पर्यंत तुम्ही मतभेदांना खतपाणी देत असता. आणि या श्रेणीत येण्याचे इच्छुक अरण्य किंवा जंगली ब्राह्मण असे अनेक लोक आहेत. म्हणून मी विनंती करतो की... आपल्या देशात फुटीरतावादी प्रवृत्तींना प्रोत्साहित करणाऱ्या भेदांना कायम ठेवू नये. याच अभिशापाने भारताला इतकी वर्षे विभाजित ठेवले आहे."*[49]

श्री कन्हैय्यालाल माणिकलाल मुंशी यांनी पण 'आदिवासी 'शब्दाचा विरोध केला. ते म्हणाले अनुसूचित जमातींचा समस्या एका प्रांता पेक्षा दुसऱ्या प्रांतात वेगळ्या असतात, आणि कधी कधी तर एका जिल्ह्या पासून दुसऱ्या जिल्ह्याच्या सुध्दा." [50] ते म्हणाले:

*"प्रत्येक प्रांतात अनेक अनुसूचित जमाती असतात. त्यापैकी प्रत्येक जमात वांशिक दृष्टीने तसेच भाषेच्या दृष्टीने, सामाजिक आणि धार्मिक चालीरीतींच्या दृष्टीने वेगळी असते. एका जमाती ची दुसऱ्या जमातीशी काहीही समानता नसते. माझ्या स्वतःच्या प्रांतात पांच जमाती आहेत ज्या या घटनेनुसार अनुसूचित जमाती आहेत. डबला, भील,कोळी, बरदास आणि गोंड. या एक दुसऱ्या पासून एकदम वेगळ्या आहेत. मला पूर्ण विश्वास आहे की कोणी ही या विचाराशी सहमत होणार नाही की बिहारचे संथाल, मुंबईचे गोंड किंवा भील आणि असम चे नागा एकाच जाती, धर्म, किंवा सामाजिक समूहाचे सदस्य आहेत. ते विभिन्न प्रकारच्या सभ्यता आणि वेग वेगळ्या भूगर्भीय काळाशी संबंधित आहेत आणि हे आवश्यक आहे की त्यांना देशाच्या बाकी भागाच्या स्तरावर आणण्या साठी विशेष प्रयत्न झाले पाहिजेत. त्या सर्वांना*

*सर्रास आदिवासी म्हणणे आणि त्यांना एकच समुदाय म्हणून स्वीकार करणे चुकीचे ठरेल. इतकेच नव्हे तर ते त्या जमातींसाठी सुध्दा विनाशकारी ठरेल. आदिवासी या देशात सामूहिक रूपाने एवढे संगठित आणि जागरूक नाहीत...''*

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा के.एम.मुंशी यांच्या मताचे समर्थन केले. आणि जेंव्हा राष्ट्रपतींनी त्यांना विचारले की तुम्ही काही सांगू इच्छिता का? तेंव्हा डॉ.अंबेडकर म्हणाले: " श्री मुंशींनी ते सर्व सांगितले आहे जे सांगायला पाहिजे होते, आणि मला वाटत नाही की मी यात आणखी काही उपयोगी जोडू शकेन ." [51]

चर्चेच्या शेवटी, अनुसूचित जमातीं साठी आदिवासी ह्या अभिव्यक्ती चा प्रयोग करण्याचा ठराव रद्द झाला. आणि घटनेत आदिवासी ह्या शब्दाचा प्रयोग कोठेही झाला नाही. घटनेच्या हिंदी आवृत्तीत सुध्दा अनुसूचित जमाती चा अनुवाद आदिवासी असा न करता अनुसूचित जमाती असाच केला आहे.[52]

तरीही, घटना सभेने जमातींच्या विकासाच्या मुद्द्यावर व्यापक चर्चा केली. याचा अभ्यास करण्याआणि शिफारस करण्यासाठी एका उपसमिती चे गठन सुध्दा केले होते. भारताची घटना ज्यात सर्व लोकांना उपलब्ध मौलिक अधिकारात समानतेचा अधिकार पण आहे. [53] सामाजिक आणि आर्थिक स्वरूपात वंचित समूहां साठी काही विशिष्ठ तरतुती केलेल्या आहेत ज्यांना त्यात अनुसूचित जाती आणि जमाती म्हणून वर्गीकृत केलेले आहे. वे वेळोवेळी काढलेल्या विशिष्ठ आदेशानुसार, सध्या 28 राज्य आणि 8 केंद्र शासित प्रदेशात 1108 जाती आणि 22 राज्यात 705 जमाती अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (एस.टी.) मध्ये सामील आहेत. सरकार द्वारे त्यांच्या विकासा साठी अनेक सकारात्मक कार्यक्रम राबविले जात आहेत. सुरुवातीला घटनेने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना 10 वर्षे आरक्षणाची तरतूद केली होती, कारण घटना सभेला हे वाटले होते की इतक्या वर्षात ते अन्य लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक स्तरावर पोहोचतील. पण आरक्षण वेळोवेळी वाढविण्यात आले आहे. जसा जसा काळ पुढे सरकत गेला अन्य मागासवर्गीय जाती सुध्दा नोकरी इत्यादींत आरक्षण मागू लागल्या, कारण त्यांना वाटले की त्या त्यात मागे पडत आहेत. सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणा या आरक्षणाचा मुख्य मापदंड आहे जाती नव्हे.

अनुच्छेद 366 (24) आणि 366 (25) घटनेच्या मसुद्याच्या अनुच्छेद 303 (1) घटनेत क्रमशः एस.सी. आणि एस.सी. आणि एस.टी. ची व्याख्या करणाऱ्या धारा आहेत. अनुच्छेद 366 (24) म्हणतो की "अनुसूचित जाती अशी जात, वंश, किंवा जमात किंवा अशा जाती, वंश किंवा जमातीच्या समूहाचे भाग आहेत ज्यांना अनुच्छेद 341 च्या अंतर्गत अनुसूचित जाती म्हंटले जाते." अशाच प्रकारे, अनुच्छेद 366 (25) म्हणतो की एस.टी. " अशी जमात किंवा

आदिवासी समुदाय, किंवा अशा जमाती किंवा आदिवासी समुदायांचे भाग किंवा समूह आहेत, ज्यांना अनुच्छेद 342 च्या अंतर्गत जमाती म्हंटले जाते." अनुच्छेद 341 व 342 मध्ये अश्या तरतुदी आहेत ज्या राष्ट्रपतींना अश्या जाती आणि जमातींना अधिसूचित करण्याचे अधिकार देतात. अश्या जाती आणि जमाती साठी कोठेही जातियतेला मापदंड बनवलेले नाही. तरीही आदिवासींसाठी मुखर होऊन तर्क देणारे सदस्य श्री जयपाल सिंह यांनी अखेर घटनेला पूर्ण समर्थन दिले. ते म्हणाले:

> *मला माहित आहे की आदिवासीं बद्दल अश्या अनेक गोष्टी आहेत ज्या घटनेत लिहिल्या गेल्या नाहीत. उदाहरणार्थ आम्हाला अजुन ही माहित नाही, की श्रीमान राष्ट्रपती, क्षेत्रांच्या वेळापत्रका बद्दल काय विचार करणार आहेत. उदाहरणार्थ आम्हाला माहीत नाही की विभिन्न अनुसूचित जातींची यादी कशी तयार होणार आहे. आम्हाला अजूनही माहित नाही आहे की केंद्रातून समन्वित प्रशासन होणार आहे की नाही जेणे करून वेगवेगळ्या प्रांतातून जेथे अनुसूचित जमाती आहेत, कामाला विनिमयित आणि निर्देशित केले जाऊ शकेल. या पैकी कोणत्याही बाबी चा उल्लेख केला गेलेला नाही. तरीही मी विश्वासाने सांगू शकतो की मला अनुसूचित जमातीं बरोबरच अन्य लोकांसाठी सुध्दा एका उज्ज्वल भविष्याची आशा आहे, कारण शेवटी हे आमच्यावर आहे की आम्ही आपल्या देशाचे भविष्य उजळावे किंवा बिघडवावे, घटनेला घडवावे की बिघडवावे. श्रीमान, याच* महान विश्वासाने मी या घटनेला आपले अयोग्य समर्थन देतो.[54]

अन्य जाती आणि जमातीं पेक्षा वेगळी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींसाठी मूळ निवासींची योग्यता भारताच्या घटनेत कोणत्याही आधराशिवाय दिली आहे आणि हा नंतर चा घटनाक्रम आहे. तथापि, सर्व भारतीयांसाठी लागू मौलिक अधिकारांशिवाय घटनेने त्यांना काही अन्य विशेष अधिकार सुध्दा दिले होते. जे त्यावेळी अधिकांश पाश्चात्य देशात समान परिस्थिती असणाऱ्या लोकांना मिळालेले नव्हते.

घटना सभे ने पूर्वोत्तर मधील जमातींच्या संदर्भात (5, 6 व 7 सप्टेंबर 1949 रोजी) सुध्दा व्यापक चर्चा केली मगर या चर्चेने उत्तर पूर्वेतील आदिवासी क्षेत्रातील प्रशासन ( घटनेची सहावी अनुसूची) वर लक्ष्य केंद्रित केले पण ' आदिवासी ' शब्दाकडे लक्ष्य दिले नाही. घटनेने जमाती शब्दाची सुध्दा व्याख्या केली नाही.[55]

जेथे अनुसूचित जाती फक्त हिंदू, बौद्ध, शीख किंवा जैनांशी संबंधित आहेत, अनुसूचित जमाती कोणत्याही पंथाशी संबंधित असू शकतात. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती

दोन्हीही सामाजिक आणि आर्थिक रूपाने भारतात सर्वात अधिक मागासलेल्या आहेत. जातीचे निकष कठोर असून ते जन्माने निर्धारित होतात. कोणी ही आपली जात बदलू शकत नाही. हीच स्थिती आदिवासींची सुध्दा आहे. काही लेखक भारताच्या सर्व जमातीच्या लोकांसाठी आदिवासी शब्दाचा प्रयोग हे समजून करतात की ते देशातील मूळनिवासी असून उरलेले सगळे वसाहत स्थापने नंतर येथे स्थायीक झाले होते. हे दुसऱ्या देशात विद्यमान वास्तविकतेला भारतावर लादण्या सारखे आहे आणि हे कोणत्याही ऐतिहासिक तथ्यांवर आधारित नाही. कारण विचाराधीन अवधी लिखित इतिहासाची पद्धत सुरू होण्याच्या खूप पूर्वीची असून कदाचित मनुष्याने लिहिणे शिकण्याच्याही पूर्वीची सुध्दा. म्हणून कोणत्याही समुहा किंवा समुदायाच्या लोकांसाठी प्रामाणिकतापूर्वक या गोष्टीचा दावा करणे शक्य होवू शकत नाही की ते वर्तमान भारताच्या कोणा भागात सर्वात पूर्वी पासून स्थायिक होते, संपूर्ण देश तर सोडाच. आणि त्यांना वसाहत स्थापने नंतर येथे स्थायीक होण्या साठी आलेल्या लोकांपैकी कोणी विस्थापित केले होते. कोणत्याही भूमीवर सर्वात पूर्वीपासून ताबा असण्याचा दावा करण्या साठी विश्वसनीय तथ्य आणि साक्ष असावे लागतात. प्राचीन इतिहासाच्या क्षेत्रात, पूर्व - ऐतिहासिक काळाशी संबंधित, अश्या प्रकारचे साक्ष अधिकतर "जीवाश्म, प्राचीन मानव वस्तीचे पुरातत्त्वीय उत्खनन, मानव निर्मित विभिन्न वस्तू ,जसे उपकरण आहेत "(टोनी जोसेफ, 2018 पान 6). 19 व्या शतकाच्या शेवटी आणि 20 व्या शतकाच्या सुरुवातीला झालेल्या एका उत्खननात ही माहिती मिळाली की, सिंधू घाटीत 2600 इसवी पूर्व आणि 1900 ईसवी पूर्व च्या मध्ये एक सभ्यता होती. त्या सभ्यतेला विकसित करणाऱ्या लोकांची वास्तविक ओळख अजून पर्यंत नक्की झाली नसली तरी इतिहासकार त्या सभ्यतेला (सिंधू घाटी किंवा हडप्पा सभ्यता) एक शहरी सभ्यता मानतात. जमातींची नव्हे. भारतातील जमाती उत्तरी अमेरिका, दक्षिणी अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया पेक्षा वेगळ्या आहेत. ज्यांना 15 व्या शतकाच्या नंतर विजेत्यांनी त्यांच्या भूमीवरून हुसकावून दिले होते.

अनुसूचित जमातींची यादी एका राज्यापेक्षा दुसऱ्या राज्यात वेगळी असू शकते. अर्थात एक समुदाय जो एका राज्यात अनुसूचित जमात आहे तो दुसऱ्या राज्यात तसा नसू शकतो. हे अधिसूचित राज्य सुचींवर आधारित आहे जे स्थानीय परिस्थितीवर निर्भर असते. वास्तविक, अनुसूचित जमातींच्या यादीची अधिसूचना ही एक सतत प्रक्रिया आहे. याद्या बनविण्या साठी जे निकष वापरले जातात ते खालील प्रमाणे आहेत. हे निकष लोकूर समिति (1965) ने ठरवून दिले आहेत.[56]

- आदमि वैशष्ट्यांचे संकेत,
- वशिष्ठि संस्कृती,
- मोठ्या प्रमाणात समुदायांशी संपर्क करण्यात संकोच,

- भौगोलकि अलगकिरण, आणि
- मागासलेपण.

सर्व राज्यात आणि केंद्र शासित प्रदेशात मिळून अनुसूचित जमातींच्या रुपात अधिसूचित जमातींची एकूण संख्या वर्तमानात 705 आहे.[57] त्या राज्य   विशिष्ठ असून त्याचा लाभ फक्त त्यांच्या मूळ राज्यातच मिळतो दुसऱ्या राज्यात नाही.[58]

स्वतंत्रते नंतर अनुसूचित जमातींचे प्रमाण वाढले आहे. 1951 च्या जनगणनेत ते 5.6 टक्के होते तर 2011 च्या जनगणनेत ते वाढून 8.6 टक्के झाले. 2011 मध्ये अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या 10,42,81,034 होती. चार राज्य आणि दोन केन्द्र शासित प्रदेशात त्यांचे जबरदस्त बहुमत आहे.  सात आणखी राज्यात त्यांची लोकसंख्या 20 टक्क्याहून अधिक आहे. हे खालील तक्त्या 1. वरून दिसून येते:

**तक्ता 1: अनुसूचित जमातीची मोठी लोकसंख्या असलेले राज्य आणि केंद्र शासित प्रदेश**

| राज्/य/ के.शा.प्/र | राज्/याच्/यालोकसंख्/येत जमातींची टक्/केवारी |
|---|---|
| **राज्/य** | |
| मिझोरम | 94.5 |
| नागालँड | 86.5 |
| मेघालय | 86.1 |
| अरुणाचल प्रदेश | 68.8 |
| मणीपुर | 40.9 |
| सिक्कीम | 33.8 |
| त्रिपुरा | 31.8 |
| छत्तीसगढ | 30.6 |
| झारखंड | 26.2 |
| उडीसा | 22.8 |
| मध्यप्रदेश | 21.1 |
| **केंद्/र शासति प्/रदेश** | |
| लक्षद्वीप | 94.8 |
| दादरा आणि नगर हवेली | 52.00 |

***स्/त्/रोत:*** भारताचे महा रजसि्ट्रार यांचे कार्/यालय जनगणना 2011.

याचा अर्थ आहे की अनेक राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील प्रशासनात अनुसूचित जमातींचा निर्णायक प्रभाव आहे.

जेथे प्राचीन काळात अनुसूचित जमातींनी मुख्यतः पर्वत आणि वन क्षेत्रात आपल्या वस्त्या निर्माण केल्या असतील, आधुनिक काळात ते "मैदान आणि जंगला पासून पर्वत आणि दुर्गम क्षेत्रां पर्यंत विभिन्न प्रकारच्या परिस्थिती, भुमी आणि जलवायुत राहत आहेत."[59] ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रात ते राहतात. 2011च्या जनगणनेनुसार, त्यांची संख्या ग्रामीण लोकसंख्येचा 8.13 टक्के तर शहरी लोकसंख्येचा 2.8 टक्के आहे. अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्येचा 89.97 टक्के भाग ग्रामीण क्षेत्रात आणि 10.03 टक्के शहरात राहतो.[60] यापैकी अनेक समुदायांनी भाषा, धर्म, आणि वेशभूषेत मुख्यधारेची जीवन शैली स्वीकारली आहे.[61]

## भारताचे सर्वोच्च न्यायालय

महाराष्ट्राच्या भिल समुदायाच्या एका महिलेच्या संबंधित एका अपील मध्ये, जिला अन्य समुदायाच्या चार लोकां कडून मारहाण, शिव्या गाळ, आणि निर्वस्त्र करून फिरवण्याचे कृत्य घडले होते, त्यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) अधिनियम, 1989 च्या अंतर्गत त्यांच्यावर दोष सिद्ध झाला होता, पण कोर्टाच्या निकालाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद पीठाने निरस्त केले होते. सर्वोच्च न्यायालयाने प्रकरणावर थक्क होऊन आपली नाराजी व्यक्त केली होती. आणि म्हंटले होते की, भारत ही आप्रवास्यांची भूमी आहे, येथे 92 टक्क्यांहून अधिक लोक आप्रवासी आहेत. पूर्व - द्रविड लोक भारताचे मूळनिवासी आहेत. या धारणेनुसार, "भारत स्थुलपणे उत्तरी अमेरिकेसारखा आप्रवासी लोकांचा देश आहे." न्यायालयाने हे सिध्द करण्याचा खूप प्रयत्न केला की अनुसूचित जमाती द्रविडांच्या पूर्वी पासून येथे होत्या. त्यांनी हे सिद्ध करण्यासाठी "दक्षिण भारतातील जाती आणि जमाती" (1909) लेखक थरस्टन यांच्या पुस्तकाला उधृत करून म्हंटले की, फक्त पूर्व द्राविडी जमातींनाच आदिम वर्तमान जमाती म्हंटले पाहिजे नंतरच्या सुसंस्कृत द्रविडांना नाही, (द मद्रास प्रेसिडेन्सी, पृष्ठ 124-5)."[62] न्यायालयाने ऑस्ट्रिक परिवाराशी संबंधित मुंडा भाषेच्या अस्तित्वाच्या आधारे हा निष्कर्ष काढला की "आता उपलब्ध साक्षांच्या आधारे,... ऑस्ट्रिक तत्व सर्वात जुने असून ते एकी कडे द्रविड आणि भारोपीय, तर दुसरीकडे तिब्बती आणि चिनी यांच्या क्रमिक लाटांनी विभिन्न क्षेत्रात प्रसारित झाले आहे." त्यांची ही धारणा या परिकल्पनेवर आधारित आहे की भूमीवर पहिल्या आगंतुकांना सोडून बाकी सर्व आप्रवासी आहेत, मग त्यांच्या येण्याचा काळ कोणताही असो. न्यायालयाचा हा आदेश भिलांना सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत लाभ करून देण्यासाठी होता, ते सामाजिक आणि आर्थिक रूपाने मागासलेले होते आणि त्यांच्या नंतर येणाऱ्या लोकांनी त्यांना विकासाच्या शर्यतीतून बाहेर केले होते. न्यायालयाने भारतातील

अनुसूचित जमातींवर झालेल्या अन्यायाला उजागर करण्यासाठी कठोर शब्दांचा प्रयोग केला होता. हा आपल्या इतिहासाचा लाजिरवाणा अध्याय असून आता त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्याची वेळ आली आहे.[63]

एकीकडे 2011 च्या या प्रकरणात न्यायालय अनुसूचित जमातीचे लोक हे भारताचे मूळ निवासी असण्या बद्दल सकारात्मक होते, तर दुसरी कडे भारताचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री वाय. के. सभरवाल त्यांनी 8 जून 2006 रोजी टोरेंटो येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय विधी संघाच्या (आई.एल.ए.) द्वीवार्षिक संमेलनात, ‘मूळनिवासिंचे अधिकार ‘या विषयावर झालेल्या एका सत्रात संबोधित करताना, मूळनिवासी शब्दाबद्दल म्हंटले होते की, “भारतात अजून सुध्दा या विषयावर चर्चा चालू आहे, काही समूहांना मूळनिवासी म्हणून मान्यता देण्यात अनेक अडचणी आहेत, आणि भारतातील सामान्य धारणेनुसार ‘मूळनिवासी ‘हा एक भ्रामक शब्द आहे.”[64] सत्राचा विषय, ‘मूळ निवासिंचे अधिकार ‘च्या संदर्भात ते म्हणाले की, मूळ निवासिंच्या अधिकाराच्या संरक्षणाच्या संदर्भात भारताचा अनुभव दुसऱ्या देशांना अभ्यासण्या सारखा आहे. श्री सभरवाल म्हणाले की या विषयावर आंतरराष्ट्रीय कायदा तेंव्हाच अर्थपूर्ण ठरेल जेंव्हा त्याला तयार करण्यापूर्वी भारता सारख्या देशांत त्यासंबंधात असणाऱ्या कायद्यांचा मॉडेल म्हणून अभ्यास केला जाईल.[65]

## स्थानीय संवाद

भारताने जिथे संयुक्त राष्ट्र संघात मूळ निवासी या शब्दाच्या नामकरणावर आपले सूक्ष्म मत मांडले होते. पण मागील वर्षात आधिकारिक कागद पत्रातून मूळ या शब्दाचा प्रयोग करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. “अनुसूचित जाती आणि आणि अनुसूचित जमाती आयोगाने, त्यांच्या 1961 च्या रिपोर्ट मध्ये म्हंटले आहे की, अनुसूचित जमातींना आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार मूळ निवासी म्हणून ओळखले जाते”.[66]

लोकसभेच्या तत्कालीन अध्यक्ष, डॉ. मीराकुमार यांनी 9 ऑगस्ट 2012 रोजी आंतरराष्ट्रीय मूळ निवासी दिवसाच्या प्रसंगी सदनास सांगितले की देशात मूळनिवासी लोकांसाठी जमाती हा शब्दप्रयोग होतो. (फैजी आणि नायर,2017). गृह मंत्रालयाने 27 सप्टेंबर 2018 रोजी आपल्या एका कार्यालयीन आदेशात या शब्दाचा प्रयोग केला. ज्याने “त्रिपुरा राज्यात स्वदेशीय लोकसंख्येच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भाषेच्या मुद्द्यांचे” परीक्षण करण्या साठी एक उच्च स्तरीय समिती ची नेमणूक केली.[67] या प्रकरणाचा संदर्भ त्या लोकांमधील एका विभाजन रेखेशी आहे जे स्वतंत्रतेच्या पूर्वीपासून त्रिपुराचे निवासी होते आणि ते जे देशाच्या फाळणीच्या वेळी किंवा नंतर वर्तमान बांगलादेशातून त्रिपुरात प्रविष्ठ झाले होते.

नागरिकता (संशोधन) विधेयक 2019 च्या उद्देश्य आणि कारणांच्या विवरणात, मूळ निवासी शब्दाचा प्रयोग या संदर्भात झाला आहे की, "हे विधेयक उत्तर पूर्वी राज्यांच्या मूळ लोकसंख्येला दिल्या गेल्या घटनात्मक गॅरंटी ची रक्षा करेल. संविधानाची 6 वी अनुसूची आणि बंगाल ईस्टर्न फ्रंटियर रेगुलेशन, 1873"[68] च्या "इनर लाईन "प्रणालीच्या अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रांना देण्यात आलेली घटनात्मक सुरक्षा, जरी विधेयकाचा सक्रिय भाग किंवा अधिनियमाच्या पाठ असला, तरी अशी कोणतीही संदर्भित तरतूद नाही. घटनेच्या 6 व्या अनुसूचित, असम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोरम राज्यातील जमातीय क्षेत्रांच्या प्रशासनाच्या तरतुदी सामील आहेत. ह्यात स्वदेशी शब्दाचा प्रयोग झालेला नाही.

तरी सुध्दा, अन्य विधानात मूळ निवासी शब्द प्रयोग झालेला नाही. अनुसूचित जमाती आणि अन्य पारंपरिक वनवासी (वन अधिकारांची मान्यता), 2006 (वन अधिकार अधिनियम), जो वनवासिंच्या कार्यकाळ आणि प्रवेशाच्या अधिकारा संबंधी त्यांच्या जुन्या असुरक्षेला दूर करण्या साठी उचललेले महत्त्वाचे पाऊल होते, मध्ये सुध्दा अनुसूचित जमाती साठी मूळ निवासी हा शब्द प्रयोग झालेला नाही. त्यात वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातीची अशी एक नवी श्रेणी निर्मित केली आहे आणि तिची व्याख्या, "अनुसुचीत जमातीचे ते लोक जे प्राधान्याने वनात राहतात आणि आजिवेकेसाठी वन किंवा वनभुमी वर निर्भर असतात यात अनुसूचित जमातींचे पशुपालक सुध्दा सामील आहेत".[69]

भारतीय मानववंश विज्ञान सर्वेक्षण चे माजी महासंचालक श्री के.एस.सिंघ, ज्यांनी भारताचे लोक ह्या प्रकल्पाचे नेतृत्व केले होते त्यांचें मत होते की जमाती आणि गैरजमाती वाद हा आत्ताचा आहे. एका मुलाखतीत (1996) ते म्हणाले की, अनुसूचित जमातींच्या चळवळी, त्यांचे प्रथागत कायदे, आणि जमातींच्या अर्थव्यवस्थेचे अखिल भारतीय सर्वेक्षण मी आयोजित केले. या सर्वेक्षणनुसार असे दिसून आले की जमाती आणि गैर जमातीतील भेद हे नवीन निर्माण झाले असून ते मुख्यतः शैक्षणिक आहेत. जमाती आणि गैर जमाती एकमेकांशी इतक्या एकात्मक आहेत की जमातींना वेगळे करणे कठीण आहे".[70]

याच बरोबर ते हे पण स्वीकार करतात की 'जमाती 'या शब्दा पासून या समुदायाच्या ओळखीला वेगळं करता येणार नाही कारण मागील दोन शतकांपासून त्यांच्या साठी हा शब्दप्रयोग होत आला आहे.

## अनुसूचित जमातींची वर्तमांत प्रशासनिक स्थिती

घटनेत अनुसूचित जमातींसाठी विस्तृत तरतुदी केल्या गेल्या आहेत.[71] या तरतुदी त्यांना संसदेत, विधानमंडळात आणि सरकारी सेवेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळविण्या साठी सक्षम करतात. या तरतुदी

घटनेच्या  5व्या आणि 6व्या अनुसूचित दिल्या असून त्या हे सुनिश्चित करतात की विभिन्न जमाती समुदाय जमातीच्या स्वरुपात आपल्या विशिष्ठ संस्कृतीची जपणूक करण्यास सक्षम होतील आणि त्यांना सहाव्या अनुसूचीच्या अंतर्गत[72] आपल्या क्षेत्रात स्वायत्त जिल्हा आणि क्षेत्रीय परिषदेच्या यंत्रणे द्वारे प्रशासनिक स्वायत्तता मिळेल. तसेच पाचव्या अनुसूची[73] द्वारे जमाती सल्लागार परिषदेची रचना केली जाते. या परिषदांना विस्तृत विधायी, कार्यकारी आणि न्यायिक अधिकार असतात. पाचवी अनुसूचि, अनुसूचित क्षेत्रातील प्रशासना संबंधी असून असम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोरम शिवाय अन्य राज्यातील  अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जमातींवर लागू होते तर अनुसूची 6 वरील चार राज्यांवर लागु होते. वन अधिकार अधिनियम कायद्याची बहुसंख्य लोकांनी अनुसूचित जमातींचा सशक्तीकरणा साठी उचललेले एक महत्त्व पूर्ण पाऊल म्हणून प्रशंसा केली आहे.[74] हा अधिनियम अनुसूचित जमाती आणि वनात निवास करणाऱ्या अन्य पारंपरिक वनवासिंच्या वना संबंधी अधिकारांना आणि त्यावर त्यांच्या ताब्याला मान्यता देतो आणि ते त्यांच्यात निहित करतो जे पिढीजात पणें त्या वनात राहत आले असून त्यांच्या अधिकारांची नोंदणी झालेले नाही. हा अश्या प्रकारच्या निहित अधिकार आणि वनभुमीच्या नोंदणी साठी आवश्यक साक्षीचे स्वरूप आणि नोंदणी ची प्रक्रिया ठरवतो. आपल्या व्याख्येत अधिनियम हे सुध्दा स्पष्ट करतो की:

> *"वसाहतींच्या काळात आणि स्वतंत्र भारतात सुध्दा पैतृक भूमी आणि संपत्तीवरील वनाधिकारांना संपूर्ण मान्यता मिळालेली नव्हती. ज्यामुळे वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती आणि अन्य वनवासिंवर ऐतिहासिक अन्याय झाला होता जे वनातील पर्यावरण आणि त्याच्या अस्तित्वाचे अभिन्न भाग आहेत".*[75]

अनुसूचित जमातींच्या बंधपत्रित मजुरी उन्मुलन अधिनियम, 1976 आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) अधिनियम 1989, सारखे कायदे पूर्वी सुध्दा अस्तित्वात होते. आता हा नवा कायदा जैविक विविधता आणि सतत विकासा साठी असलेल्या भारताच्या वचन बद्धते साठी हितावह आहे. वनावर निर्भर असलेल्या वनवासी जमातींची सुध्दा वन उत्पादनाच्या संग्रहणाच्या आपल्या  परंपरागत उद्योगासाठी जैविक विविधतेला जतन करून ठेवण्यात सकारात्मक रुची असते.

अनुसूचित जमातींच्या एकिकृत सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दिशेने अधिक केंद्रित दृष्टिकोणासाठी पृथक जमातीं संबंधी व्यवहार मंत्रालयाची स्थापना 1999 मध्ये झाली. भारत सरकार द्वारे अनुसूचित जमातीं साठी घटनेच्या अनुच्छेद 338 A च्या अंतर्गत एक राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना केली आहे. आयोग इतर गोष्टीं सोबत घटना आणि इतर कायद्यांच्या द्वारे जमातींना मिळालेल्या सुरक्षा उपायां संबंधित प्रकरणांची चौकशी आणि देखरेख

करतो. आयोगाचा अध्यक्ष केंद्रीय केबिनेट मंत्रीच्या स्तराचा असतो. पहिला आयोग 2004 मध्ये स्थापित झाला होता.

## उपयुक्त शब्द: मूळनिवासी, आदिम किंवा जमातीय?

अकादमिक साहित्य आणि आधिकारिक अभिलेखात अनेक शब्द आहेत जसे पहिले लोक, पहिले राष्ट्र, आदिवासी लोक, मूळ निवासी लोक, स्वदेशी लोक जे आजच्या काळात प्रयुक्त होतात, हे तेच शब्द आहेत जे आंतरराष्ट्रीय चर्चेत प्रचलित असतात 'मूळ 'जरी संयुक्त राष्ट्रसंघाने प्रयोग केला असला तरी त्याला जागतिक मान्यता मिळालेली नाही. 2017 च्या एका प्रपत्रात म्हंटले आहे की अनेक जमाती समूह 'मूळनिवासी 'किंवा 'आदिवासीं 'पेक्षा 'प्रथम राष्ट्र 'शब्दाला पसंत करतात[76]. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, संयुक्त राज्य अमेरिका इत्यादींत 'प्रथम राष्ट्र 'या शब्दाला अधिक स्वीकार्यता मिळाली आहे. तरी काहींचे म्हणणे आहे की अन्य काही शब्दां सोबत हा शब्द सुध्दा. "जमाती समूहांना अप्रिय आहे, विशेषतः जेंव्हा तो एक आंतरराष्ट्रीय, समग्र आणि सार्वभौमिक प्रकारे प्रयोग केला जातो".[77] त्यांचे मत आहे की हा शब्द वेगवेगळया समूहांना समरूप दर्शविण्यासाठी प्रयुक्त केला जातो. जसे वसाहतवादी मानववंशशास्त्रींनी मूलतः वेग वेगळ्या जमाती समूहांना मूळनिवासी या एकाच शब्दात परिभाषित केले. या शब्दावलीत सुध्दा मौलिक रूपाने वेगळे असणाऱ्या लोकांना समरूप बनविण्याचा प्रयत्न आहे. जसा प्रारंभिक वसाहतवादी मानववंश शास्त्रिंनी अन्य लोकांसाठी मूळनिवासी शब्द तयार केला होता जे वसाहत कायम करणाऱ्या लोकांपासून वेगळे होते. अनेक विद्वानांचा तर्क आहे की "जगात जमाती समूहांना ओळख देण्यासाठी प्रयुक्त केल्या जाणाऱ्या सामूहिक संज्ञा वेगाने विवादग्रस्त होत चालल्या आहेत कारण आपल्या मूलतः ते शब्द अपमानजनक, ऐतिहासिक रूपाने तृटीपूर्ण आणि वसाहतवादी अतीताने दूषित असून 'आदिम 'लोकांच्या अपमानजनक धारणे वर आधारित असून पाश्चात्य लोकांच्या श्रेष्ठत्वाच्या धारणेवर आधारित असतात "(पीटर्स आणि मिका, 2017). तरी सुध्दा अनेक लोक अजूनही 'मूळ निवासी 'शब्दाचा प्रयोग करतात. मूळ निवासिंच्या अधिकारांना वृद्धीगत करण्या साठी, त्यांच्या सुरक्षा आणि संरक्षणासाठी समर्पित स्वदेशीय प्रकरणांसाठी समर्पित आंतरराष्ट्रीय कार्यसमूह (आई.डबल्यू.जी.आई.ए.) एक जागतिक मानवाधिकार संघटना असून तिचे मुख्यालय कोपनहेगन ला आहे, ती आणि आंतरराष्ट्रीय श्रम संगठन (आई.एल.ओ.) इत्यादि सुध्दा हा शब्द प्रयोग करतात. काही विद्वान 'मूळ आणि जातीय '[78]शब्दाचा प्रयोग करतात. रॉक्सेन डनबर - आर्टीज ने संयुक्त राज्य अमेरिकेच्या इतिहासाला त्या भूमीच्या मूळ निवासिंच्या दृष्टिकोनातून, "संयुक्त राज्य अमेरिकेच्या मूळ निवासी लोकांचा एक इतिहास "(2014) हे शीर्षक दिले. त्यात 'मूळ "इंडीयन 'आणि 'स्वदेशी 'इत्यादि शब्दांचा समान अर्थाने प्रयोग झाला आहे. जेंव्हाकी इंडीयन शब्द अपमानजनक समजला जातो. लेखकाचे म्हणणे आहे की उत्तर अमेरिकेत मूळ निवासी "सामान्यतः त्याला कलंक समजत नाहीत[79]" 'मूळ 'शब्दाचा प्रयोग भारतात फोरम

उडिसा (आई.पी.एफ.ओ.), झारखंड इंडिजिनस एंड ट्राईबल पिपुल्स फॉर एक्शन (जे.आई.टी. पी.ए.) आणि इंडिजिनस फोरम (जेड.आई.एफ.), मिझोरम इत्यादि सारख्या अनेक नागरिक समाज संघटनां द्वारे केला जातो. तरीही जसे पीटर्स आणि मिका यांनी एका संपादकीयात बघितले की, 'मूळ, "आदिम 'आणि त्याच्या समानार्थी शब्दांना तेथे संबंधित लोकांद्वारे आक्षेप घेतला जातो. "कारण या शब्दांत लोकांच्या समरुपीकरणाची ध्वनी आहे". जशी पूर्वी साम्राज्यवादी मानववंशशास्त्रींनी 'अन्यलोक 'किंवा 'स्वदेशी 'सारख्या शब्दांनी वसाहतीं आणि त्यांच्या बरोबर येणाऱ्या लोकांचा विरोध करणाऱ्या लोकांना संबोधित करीत असत "(पीटर्स आणि मिका: 2017).

भारतात, ट्राईब, आदिवासीं, वनवासी, इत्यादि शब्द अनेक वेळा एक दुसऱ्याच्या जागी समान अर्थाने प्रयोग होत आले आहेत. आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यक अधिकार समुहाच्या अनुसार आदिवासी शब्द हा "भारतातील अनेक मूळ लोकांचे "सामूहिक नाव आहे. हे पण समजावले गेले की हा शब्द दोन हिंदी शब्दांनी मिळून तयार झाला आहे. 'आदी 'म्हणजे जो सुरुवाती पासून आहे आणि 'वासी 'म्हणजे निवासी. शब्दाच्या प्रयोगा संबंधात मायनॉरिटी राईट्स ग्रुप इंटरनॅशनल म्हणतो की, "हा शब्द 1930 च्या दशकात तयार झाला होता, बहुदा तो भारतातील विभिन्न मूळ निवासी लोकांची ओळख तयार करण्यासाठी एका राजकीय आंदोलनाचा परिणाम होता".[80] लेखात हे स्वीकार केले आहे की सर्व जमाती एक समरुप समूह नाहीत. आणि "त्यांचा इतिहासाची सुध्दा खूप कमी माहिती आहे". असे वाटते की में 1938 मध्ये आदिवासी महासभेच्या स्थापने नंतर हा शब्द लोकप्रिय झाला, आदिवासीं महासभेचे अध्यक्ष श्री जयपाल सिंह होते आणि त्याचा उद्देश्य छोटा नागपूर आणि संथाल परगण्यांना मिळवून एक वेगळा प्रांत बनविण्याचा होता, जो त्यावेळी बिहारचा भाग झाला होता. [81] दासगुप्ता आणि संगीता (2018) म्हणतात की 'आदिवासी 'शब्द राजनीतिक दृष्ट्या मुखर शब्द आहे आणि हा "1938 मध्ये सर्वप्रथम राजनीतिक संदर्भात प्रयुक्त झाला".[82]

डॉ.आंबेडकरांनी जमातिंसाठी आदिम लोक हा शब्द प्रयुक्त केला आहे. त्यांनी आपले पुस्तक *एनिहिलेशन ऑफ कास्ट* (1936) जे लाहौर मध्ये जात पात तोडो मंडळाच्या वार्षिक संमेलनात देण्यासाठी तयार केलेले एक भाषण होते, पण ते तेथे वितरित झाले नव्हते, म्हंटले आहे की, "हे आदिम लोक एक अश्या भूमीवर, जेथील सभ्यता हजारो वर्ष जुनी आहे, आपल्या आदिम असभ्य अवस्थेत राहिलेले आहेत."[83] ते जमातींचे फार कौतुक करीत नसत, 6 मे 1945 रोजी मुंबईत आयोजित अखिलभारतीय अनुसूचित जाती महासंघाला संबोधित करताना ते म्हणाले की, "आदिम जमातींनी आपल्या राजकीय संधिंचा सर्वोत्तम उपयोग करून घेण्यासाठी अजून पर्यंत कोणतीही राजकीय समज विकसित करून घेतलेली नाही आणि ते सहजगत्या कोणत्याही बहुसंख्यांक किंवा अल्पसंख्याकांच्या हाताचे बाहुले होवू शकतात. आणि अश्या प्रकारे ते स्वतःचा कोणताही लाभ

करून न घेता संतुलन बिघडवू शकतात".[84] हे त्याच्या विपरीत आहे जे 19 डिसेंबर 1946 ला जयपाल सिंह यांनी घटना सभेत तर्क देताना म्हंटले होते. जयपाल सिंह म्हणाले होते की, आदिम जाती आपल्या बरोबर प्रत्येक अन्य भारतीयांच्या समकक्ष व्यवहार इच्छितात. आणि कोणत्याही प्रकारचे विशेष संरक्षण इच्छित नाहीत. ही भूमिका त्यांची उच्च राजनीतिक समज प्रदर्शित करते.[85] डॉ.आंबेडकरांचे विचार अनुसूचित जातीं साठी त्यांच्या चिंतेने प्रभावित असू शकतात. ज्या पैकी अनेक अस्पृश्य होते आणि त्या कुप्रथे विरूध्द संपूर्ण देशात अनेक आंदोलने होत होती. पण याच्या विपरित जमातींच्या बाबतीत असे नव्हते. ते पूर्वी पण आणि नंतर घटना सभेत सुध्दा अनुसूचित जमातींसाठी अनुसूचित जातीं पेक्षा वेगळया दृष्टिकोनातून आपले मत मांडीत होते. तथापि, मुख्य मुद्दा हा आहे की डॉ. आंबेडकर सुध्दा 'आदिवासीं 'हा शब्द प्रयोग करीत नसत.

'आदिवासीं 'शब्द सध्या भारतात आणि विदेशात सुध्दा सामान्य चर्चेत आणि मीडिया रिपोर्टमध्ये भारतातील सर्व जमातीच्या लोकांसाठी प्रयुक्त होत आहे. मग भलेही तो अनुसूचित जमातीतील असो वा नसो. वास्तविक आदिवासीं लोकांचा एक समूह नसून, तो विभिन्न जमातींशी संबंधित आहे. ज्या विभिन्न राज्यात आणि स्थानात स्थायिक आहेत. त्यात शहरे सुध्दा आहेत. त्यांच्यात विभिन्न धर्माचे अनुयायी, विभिन्न भाषा परिवाराशी संबंधित विभिन्न भाषा बोलणारे, त्यांच्या विभिन्न सांस्कृतिक आणि सामाजिक प्रथा आहेत. त्याच बरोबर शिक्षाविद आणि नागरिक सामाजिक संघटनात 'आदिवासी 'शब्दप्रयोगावर अजून ही सहमती निर्माण झालेली नाही. ज्याचा संस्कृत मध्ये शाब्दिक अर्थ आहे मूळ किंवा सुरुवाती पासून राहणारे (आदी = प्रथम आणि वासी = निवासी) घुर्येंना हा शब्द पटत नव्हता म्हणून त्यांनी 'तथाकथित आदिम लोक '(क्साक्सा, 1999) वाक्याचा प्रयोग केला. 2016 मध्ये एका प्रपत्रात सर्व प्रथम बॅनर्जी यांनी एका पद टीप्पणीत है स्पष्ट केले की ते दोन्ही शब्द प्रयोग करतात कारण उत्तर पूर्वे चे स्वदेशीय समूह स्वदेशी किंवा आदिवासी म्हणण्या पेक्षा जमाती म्हणणे पसंत करतात कारण हा (आदिवासी) शब्द तेथे मध्यभारतातील आप्रवासीन साठी प्रयुक्त केला जातो.[86] अर्थशास्त्रात [87] (कमीत कमी 1000 वर्षा पूर्वी लिहिल्या गेलेली राज्य व्यवस्थे वरील एक प्रमुख रचना), कौटिल्य, जमाती आणि आदिवासी लोकांचा संदर्भ देतात. ते सीमावर्ती जमाती (सीमांत जाती) ची चर्चा करतात. ("सीमावर्ती क्षेत्र एक तर पहाडी होते किंवा मग वनात जमातींचा निवास होता जे पूर्णपणे राजाच्या नियंत्रणात नव्हते.")[88] आणि जमातींचे स्वतंत्र असणे ("निरंकुश जंगली जमाती आपल्या क्षेत्रात राहतात ज्या मोठ्या संख्येत आहेत, वीर आहेत, दिवसा उजेडी लढतात आणि राज्यांना जिकण्या किंवा नष्ट करण्याची क्षमता ठेवून राजा सारखा व्यवहार करतात")[89] परंतु आदिवासी शब्दाचा प्रयोग करीत नाहीत.

जरी जमाती अधिकतर पहाडी किंवा वनक्षेत्रात स्थायिक असतात. 14 ते 18 व्या शतकाच्या काळात मध्य भारतात काही जमातींनी गोंड राज्या सारखे आपले राज्य सुध्दा स्थापित केले. वास्तविक त्यांनी जवळ जवळ चार शतके मध्यभारताच्या पूर्ण पहाडी क्षेत्रावर राज्य केले. ज्यात

मध्यप्रदेश, छत्तीसगढ आणि महाराष्ट्रातील विदर्भाचा काही भाग सामील होता. अंतर्विवाह सहित, त्याकाळच्या हिंदू आणि मुस्लिम परिवारांच्या प्रमुख शाही संस्कृतीच्या बरोबर या जमातींची देवाण घेवाण चालत असे. कोरेती(2016) मध्य भारतातील विभिन्न गोंड राज्यांच्या अनेक वैभवशाली राजांची चर्चा करतात. त्यांची मातृभाषा गोंडी होती जी इंडो - द्रविड परिवाराशी संबंधित असून मध्यप्रदेश, छत्तीसगढ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगाना आणि ओडिसा या सहा राज्यात बोलली जात असे.[90] प्राचीन काळात कंबोज नावाचे एक जमातीय राज्य होते त्याचा उल्लेख महाभारतात सुध्दा आहे. असमचे अहोम साम्राज्य (1228 ते 1838) एक आणखी उदाहरण आहे [91]. अहोम आणि गोंड यांच्या विपरीत असे अनेक राजे आहेत ज्यांनी फक्त वनक्षेत्रात आपल्या प्रजेवर शासन केले. जसे केरळ चे मन्नान, जनश्रूती प्रमाणे त्यांचे राज्य 700 वर्ष जुने आहे आणि ते पांडय राजा चिरायवर्मन चे वंशज आहेत. ज्याला एका चोल राजाने पराजित केले होते. आणि तो 700 वर्षा पूर्वी केरळच्या इडुक्की जिल्ह्यात येऊन स्थायीक झाला होता [92].

1998 मध्ये आंद्रे ब्रेटलीने एका प्रपत्रात[93] भारताच्या काही समुहांसाठी 'जमाती ' शब्दाच्या क्रमिक विकासाचे वर्णन केले आहे. ते पूर्वीच्या काळातील शब्दांच्या उपयोगाबद्दल सांगतात जसा 'आदिम 'शब्द जो दुसऱ्या महायुध्दा नंतर प्रचलना बाहेर झाला. 'वंचित ''पहाडी आणि वन जमात ''आदिम जमात '(आदिवासी) आणि नंतर सांगतात की 'अनुसूचित जमात 'शब्दाला भारत सरकार ने स्वतंत्रतेच्या पूर्वीच स्वीकारले होते. ते म्हणतात, भारतात "'जमाती आणि गैर जमाती दोन्ही प्रकारच्या लोकांत अनाधिकार ग्रहण, वंशीय मिश्रण, आणि आप्रवसाना द्वारे अनेक परिवर्तन झाले आहेत "आणि 19 व्या शतकाच्या मध्या पर्यंत आजच्या जमातीत मोठ्या प्रमाणात "आर्थिक, सामाजिक, आणि राजनीतिक रूपाने एक तर अधीन झाल्या आहेत किंवा वेगळया पाडल्या गेल्या आहेत." पण ऑस्ट्रेलिया किंवा संयुक्त राज्य अमेरिकेत हे अनाधिकार ग्रहण ज्या प्रकारे शक्ती च्या बळावर जबरदस्तीने झाले त्या पेक्षा वेगळे आहे. आणि जगाच्या एखाद्या विशेष भागातील एका विशेष अनुभवाच्या प्रत्युत्तरात निर्मित झालेल्या 'मूळ 'शब्दाच्या प्रयोगा ची उपयुक्तता भारतीय संदर्भात विवादास्पद आहे.

भारतीय संदर्भात, 'मूळ 'शब्दाच्या संकल्पनेला एका खंडीय दृष्टिकोनातून तपासण्याची गरज आहे न की राज्य अथवा राष्ट्राच्या दृष्टिकोनातून. राष्ट्र किंवा राज्यात सामान्यतः एक प्रमुख समूह असतो ज्याची भाषा आणि संस्कृती त्या राज्या किंवा राष्ट्राच्या अस्तित्वाचा आधार असते. भारताच्या संदर्भात बघितले तर, जगातील्या दुसऱ्या सर्वात मोठ्या लोकसंख्येच्या बरोबरच, जी जगाच्या एकूण लोकसंख्येच्या 16 टक्के, 2.4 टक्क्याहून अधिक भूभागा बरोबर [94]. ज्याच्या घटनेतच 22 आधिकारिक भाषांना मान्यता दिलेली आहे.[95] या भाषा चार प्रमुख भाषा समुह, अर्थात इंडो - युरोपियन, द्राविडीयन, ऑस्ट्रो - एशियाटिक, आणि चिनी - तिबेटी शी संबंधित आहेत. विभिन्न लिपी आहेत ज्या येथेच विकसित झाल्या आहेत. वेग वेगळया प्रदेशात प्रमुख

भाषा वेग वेगळ्या आहेत. केरळच्या एका टोकाला 96 टक्क्या हून अधिक लोक मलयाळम भाषा बोलणारे आहेत तर दुसऱ्या टोकाला नागालँड मध्ये फक्त 14 टक्के लोक एओ भाषा बोलणारे लोक आहेत. देशात 1652 मातृ भाषा आहेत, त्यात 103 विदेशी मातृभाषा सुध्दा आहेत.[96] येथे शेकडो वेग वेगळे समुदाय आहेत जे मिळून एक देश निर्माण करतात एकच भाषा बोलणाऱ्यांचा एक समुदाय नाही. यात सर्व जाती जमातींचे लोक समान भागीदार आहेत. यासर्वांची मुळे या देशात 2000 वर्षाहून अधिक जुनी आहेत. या दृष्टीने भारतातील सर्व लोक 'मूळ ' असून त्यांच्यात भेद करणे योग्य होणार नाही.

अकादमिक आणि सक्रिय साहित्यात सक्रिय अनेक {परमार (2018 आणि 2019), पिल्लई (2014)} लोक आहेत जे भारताच्या जमातीय लोकांना संदर्भित करण्या साठी मूळ शब्दाचे समर्थन करतात. त्यांचा तर्क मुख्यतः या कथनावर आधारित आहे की जमातीचे "लोक हे भारताचे प्रारंभिक निवासी आहेत."[97] ते घटना सभेत जयपाल सिंह यांनी मांडलेले विचार आणि कैलाश प्रकरणात(2011) मध्ये सर्वोच्च न्यायालया ने दिलेल्या निर्णयावर निर्भर असतात. सर्वोच्च न्यायालया ने या गोष्टीचे परीक्षण केले होते की जमातीचे लोक कदाचित भारताच्या मूळ नीवास्यांचे वंशज आहेत. त्यांनी हे पण बघितलं की अत्याधिक गरिबी, अशिक्षा, बेकारी, आजारपण आणि भूमिहीनतेची त्यांची स्थिती ही ऐतिहासिक अन्यायाचा परिणाम आहे. या अश्या वंचना आहेत ज्या निश्चित रूपाने तत्काळ दूर करण्याची गरज आहे. न्यायालयाने म्हंटले की, " ऐतिहासिक रूपाने वंचित समूहांना विशेष सुरक्षा आणि मदत दिली गेली पाहिजे जेणे करून त्यांना त्यांच्या गरिबी आणि निम्न सामाजिक स्थितीतून वर काढले जाऊ शकेल."[98]

जमातीच्या लोकांना एक अंतरनिहित भय आहे की जमातीच्या लोकांना मूळनिवासी न मानण्याने त्यांना मूळनिवासिंच्या मानव अधिकारा पासून वंचित केले जाऊ शकेल, जो त्यांचा अधिकार आहे. स्वदेशी समुदायाच्या मानव अधिकारांच्या रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय चळवळीचा भाग होण्याने स्वाभाविक रूपाने त्यांच्या प्रयत्नांना बळ मिळते. कार्लसन चे म्हणणे आहे की भारतात अनेक जमातींच्या संघटना आपल्या अधिकारांना स्थापित करण्यासाठी आपल्या चळवळी याच मुद्द्यावर आधारित करतात की ते लोक या देशाचे मूळ निवासी आहेत. ते मूळनिवासिंच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या राष्ट्रीय, क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय नेटवर्कात भाग घेतात (कार्लसन, 2008). 'आदिवासीं 'किंवा 'मूळनिवासी 'च्या पक्षातील अनेक कार्यकर्ता जमातींच्या लोकांना भूमी अधिकारां पासून वंचित करण्या संबंधात चिंतित आहेत. ते विकास प्रकल्पांसाठी घेतल्या जाणाऱ्या जमातींच्या भूमीच्या बहाली साठी उठाव करतात. उत्तरपूर्वेत जमाती समुदाय कोळसा, जंगल, आणि तेलावर आपल्या स्वामीत्वाच्या मान्यतेची मागणी करतात (आई. डब्ल्यु. जी.आई.ए. 2021). ते नेहमी आपल्या भुमी आणि संस्कृती वरील आपल्या अधिकारा साठी चिंतित असतात, जसे की साईमन आयोगाने (1928) म्हंटले आहे: "ते आत्मनिर्णयासाठी नाही,

भूमीच्या रक्षणा साठी, आजीविकेच्या पारंपरिक साधनांच्या प्राप्ती साठी,आणि पारंपरिक चाली रीतींच्या समुचीत पालनाच्या स्वतंत्रतेची मागणी करतात."[99] या चिंता अजूनही तशाच आहेत, आणि 'मूळनिवासी 'हे नामकरण त्यांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर आपल्या मागण्या ठेवण्यात मदत करतात. उदाहरणार्थ, रॉय बर्मन म्हणतात की, "जमातिंसाठी आदिम किंवा स्वदेशीय दर्ज्याचा दावा करण्याच्या प्रमुख कारणां पैकी एक हे आहे की तो त्यांना क्षेत्रीय, भुमी अधिकार, आणि प्राकृतिक साधनांवर नियंत्रण मिळविण्यात सक्षम करतो "(रॉय बर्मन, 2009). या सीमे पर्यंत, या शब्दाचा प्रयोग एक राजनीतिक कथन आहे.

भारतात मागील काही शतकात मोठ्या प्रमाणात लोकांच्या आप्रवासन आणि सामूहिक संहाराच्या घटना न झाल्याने तो वसाहतिक बनावटीच्या पारंपरिक व्याख्येत बसत नाही. भारतात सुविधा संपन्न आणि वंचित दोन्ही प्रकारचे समूह आहेत आणि ब्रिटिश भारतातले सर्व लोक तसेच अपरोक्ष रूपाने रियासतीतील लोक सुध्दा 1947 पर्यंत वसाहतीच्या आधीनच होते, मग त्यांचे मानवशास्त्रिय, सामाजिक किंवा आर्थिक वर्गीकरण काहीही असो. पण बेटलीच्या हे निर्देशनास आले की, आजच्या काळात बौद्धिक विषय इतके व्यवस्थित आहेत की जगाच्या कोणा विशेष भागात कोणा विशिष्ठ भागातील अनुभवाच्या प्रत्युत्तरार्थ तयार होणाऱ्या संकल्पना आणि अटी व्यापक रूपाने जगातील अन्य भागात पसरतात आणि तेथे आपले स्वतःचे स्वरूप घडवतात. "[100] यामुळे बौद्धिक भ्रम निर्माण होतो आणि त्याचा काही समुहांच्या द्वारे आपल्या राजनीतिक आणि आर्थिक अजेंडा तयार करण्या साठी उपयोग केला जातो. दासगुप्ता,एस (2018) स्पष्ट सांगतात की 'मूळनिवासी 'शब्दाचा शाब्दिक अर्थ या समुदायांना जागतिक क्षेत्रात मूळ निवासी म्हणून रणनितिक आणि राजनीतिक रूपाने स्वतःला स्थापित करण्यास मदत करतो."[101]

अनुसूचित जमातीं शिवाय अन्य निवासी सुध्दा मूळनिवासी असल्याचा दावा करतात. यात दलीत, मणिपूरचे वैष्णव मैतेई आणि आसामच्या हिंदू जातीं सारखे अनेक अन्य समूह सामील आहेत (रॉय बर्मन: 2009).

भारतात वास्तविक रूपाने सर्वात पहिले स्थायी होणाऱ्या लोकांना शोधून काढणे खूप कठीण आहे. पण हे एक तथ्य आहे की उत्तर पूर्वेतील नागा जमाती सारख्या अनेक जमाती खूप प्राचीन काळा पासून स्थायिक झालेल्या नाहीत. असे समजले जाते की त्या इसवी पूर्व पहिल्या सहस्त्रकाच्या मध्यात भारतात आल्या. मिझो तर 16 व्या शतकातच भारतात आले (क्साक्सा:1999). आणि जमाती तसेच अन्य समुदाय सुध्दा पूर्वीच्या काळापासून भारतात सुध्दा वेळोवेळी आपल्या राहत्या स्थाना पासून स्थलांतरित होत आले आहेत. भारतात कोणत्याही समुहाची ऐतिहासिक आनुवंशिकता तपासण्याची प्रक्रिया भ्रमपूर्ण कसरतच ठरेल. कारण यासाठी संपूर्ण भारतीय उपमहाद्विपाला एक समजला पाहिजे किंवा एखाद्या विशिष्ठ क्षेत्राला त्यासाठी आधार बनवला

पाहिजे, एका ठिकाणी स्थायित्वाचा अवधी काय असावा आणि जेंव्हा लोक एक दुसऱ्यात मुक्तपणे मिसळत असतील तर त्यांच्या सांस्कृतिक शुद्धतेची खात्री कशी करावी?

जे लोक 'मूळ 'शब्दाच्या पक्षात आणि भारतातील अनुसूचित जमातींना मूळनिवासीच्या रुपात मान्यता देण्याच्या पक्षात तर्क देतात,[102] त्यांची मुख्य चिंता ही आहे की संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेंत नीहित मानवाधिकारांवर आधारित सिद्धांत आणि दायित्वांना या लोकांपर्यंत पोहोचविले गेले पाहिजे. उदाहरणार्थ, 2016 मध्ये संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेला पाठविलेल्या आपल्या निरीक्षणात कल्चरल सर्वाइवल ने ज्या अधिकारांच्या उल्लंघनाची तक्रार केली आहे [103] त्यात, भुमी आणि निवासाचा अधिकार, शोषण करणाऱ्या उद्योगां द्वारे स्वतंत्र, पूर्व आणि सूचित सहमतीची उपेक्षा, यातना, शारीरिक शोषण आणि हत्या. हे सामान्यतः त्या सर्व समुदायां बरोबर समान रूपाने लागू होते जे प्रकल्पाच्या क्षेत्रात निवास करतात. यात दुमत नाही की अनुसूचित जमातीच्या लोकांच्या मानव अधिकारांचे रक्षण झाले पाहिजे. पण अन्य समुदायाचे विशेष करून अनुसूचित जाती सारख्या दुर्बल समुहांचे सुद्धा अधिकार आहेत त्यांचे सुध्दा रक्षण झाले पाहिजे. याच बरोबर आत्मनिर्णया सारख्या संकल्पना समस्या निर्मित करतात. कार्लसन ने राष्ट्रसंघात भारताच्या संभावित भूमिके बद्दल बोलताना म्हंटले होते की, "यामुळे राष्ट्रीय संप्रभुता आणि अखंडता संकटात येण्याची भीती आहे." (कार्लसन,1999 पृष्ठ. 26 ). काही समुदायावर, ज्यांना घटनेच्या अंतर्गत सकारात्मक कारवाई साठी विशेष उपचार दिले गेले आहेत, त्यांच्यावर मूळनिवासीचा शिक्का लावण्याने गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका आहे. भलेही त्यात ऐतिहासिक सत्यता असो वा नसो. पूर्वी म्हंटल्या प्रमाणे, विकासासाठी दिले जाणारे असे विशेष उपचार सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने मागासलेल्या काही अन्य समुदायांना सुध्दा दिले जात आहेत जश्या अनुसूचित जाती ज्या जमातीं पेक्षा अधिक नाही तरी त्यांच्या एवढ्या तरी मागासलेल्या निश्चित आहेत, त्यांना जमातीच्या विरूध्द उभे करणे अनुचित आहे.

अनुसूचित जमाती साठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक शब्दाचे आपले फायदे आणि तोटे आहेत. आदिवासी शब्द, ज्याचा अर्थ आहे फक्त पहिले पासून राहत आलेले लोक, काही विशिष्ठ भागात प्रयोग झाल्याने सामान्य संभाषणात त्याने काही विकृत अर्थ ग्रहण केला आहे. त्याचा अर्थ 'असभ्य 'आणि 'बर्बर 'लोक असा समजला जाऊ लागला आहे. हा प्रभाव निश्चितच या शब्दाच्या शब्दकोशीय अर्था वरून झाला नसून दुसऱ्या प्रभावशाली लोकांनी या जमाती बद्दल निर्माण केलेल्या धारणेतून निर्माण झाला आहे. म्हणजे त्यांना समाजातील अन्य लोक जे समजतात त्यावरून निर्माण झाला आहे. केंब्रिज डिक्शनरीत मूळ निवासी शब्दाचा अर्थ आहे,, "ते लोक जे मुळतः एकाच जागी निवास करत आले असून जे कोणत्याही अन्य स्थानावरून तेथे आलेले नाहीत. "104या व्याख्येचा विस्तार करून, कोणतेही दोन निष्कर्ष काढले जाऊ शकतात. एक मूळ निवासी लोक ते आहेत जे अजूनही तेथे आहेत जेथे होमो सेपियंस (वंश) मूळ रूपाने सुरू

झाला, ज्ञानाच्या वर्तमान अवस्थेनुसार जे आफ्रिकेतील विक्टोरिया सरोवराच्या जवळपास आहे, आणि दोन कोणत्याही भूमीवर स्थायिक होणारे पहिले मानव (जे एशिया आणि आफ्रिकेच्या अधिकांश भागात अत्यंत सापेक्ष आणि समस्याग्रस्त आहेत, कारण वर्तमान राजनीतिक सीमा खूप प्राचीन नाहीत.) असे वाटते की सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्या दृष्टिकोनाचे पालन केले आहे, पण भारताच्या क्षेत्राच्या आत ("भील संभवतः भारताच्या काही मूळ निवासिंचे वंशज आहेत जे देशाच्या विभिन्न भागात विषेश करून दक्षिण राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश इत्यादींत निवास करतात). "105याच बरोबर हे पण समजले पाहिजे की भारतात आदिवासी शब्द त्या लोकांवर लागू होतो, ज्यांना प्रभावी समुदाया पासून वेगळे चीन्हीत करण्या साठी समुदायाच्या बाहेरच्या लोकांद्वारे या प्रकारे संबोधित केले जाते. हे पण लक्षात ठेवले पाहिजे की या शब्दाला आता संबंधितांनी आत्मसात केले असून ते याला सशक्तीकरणाच्या मुखर अभिव्यक्तीचे उपकरण म्हणून प्रयोग करीत आहेत (Xaxa,1999).

## निष्कर्ष

भारतात राष्ट्र निर्माणाची एक विशिष्ठ प्रक्रिया चालू आहे. वेगवेगळया भाषा बोलणारे वेगवेगळे समुदाय, वेग वेगळ्या पंथांचे अनुसरण करणारे लोक, सामाजिक आणि सांस्कृतिक बाहुल्यता बरोबर घेऊन हे राष्ट्र निर्माण करीत आहेत आणि त्यासाठी त्यांनी एक अशी घटना तयार केली आहे जी त्या सर्व नागरिकांना मूलभूत मानव अधिकार, मौलिक अधिकारांच्या रुपात उपलब्ध करून देण्याची हमी देते. विभिन्नता संरक्षित करण्या साठी, ती अल्पसंख्यक आणि अन्य लहान समूहांना तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसारख्या सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समूहांना विशेष अधिकार उपलब्ध करून देते. पण याचा उद्देश्य सर्वांचे समान भागीदार म्हणून एकीकरण करणे हा आहे संलग्नक निर्माण करणे नव्हे. येथे आतला किंवा बाहेरचा असा भेद नसून कोणी ही मूळनिवासी किंवा उपरे लोक नाहीत. येथे एक लोक एक देश आहे. नामकरणा संबंधी आंतरराष्ट्रीय चर्चेत भारताची भूमिका निरंतर याच मुलभूत स्थितीवर आधारित असली पाहिजे. हे मानव आनुवंशिक संसाधनांसहित, आनुवांशिक संसाधनांच्या लाभ वाटप नितीशी सुध्दा सुसंगत असले पाहिजे.106 परंपरागत ज्ञानाचे संरक्षण, जैविक संसाधनांचे संवर्धन, पारंपरिक चिकित्सा पद्धतिचा अधिकतम उपयोग आरोग्य सेवा, हवामान नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षण हे सर्व आपसात एकमेकांशी जुडलेले आहेत. कोणत्या समूहाचे काहीही नामकरण झाले तरी त्याची पर्वा न करता भारताने या कडे लक्ष देण्याची गरज आहे की सर्व भारतीय विकासा चे लाभ प्राप्त करण्यास सक्षम होतील आणि काही वर्षातच देशात सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने कोणी ही मागासलेला राहणार नाही. आणि त्यामुळे भारत अंततोगत्वा जागतिक व्यासपीठावर आपले उचित स्थान प्राप्त करण्यात सक्षम होईल.

# संदर्भ


आंबेडकर बी. आर. 1936. एनहीलेशन ऑफ कास्ट. एस. आनंद नवायनाचा सटीक आणि समालोचक संस्करण. 2014.

बॅनर्जी प्रथमा, 2016. "रायटिंग द आदिवासी: सम हिस्टोरीग्राफिकल नोट्स इन द इंडियन इकॉनॉमिक एन्ड सोशल हिस्टरी रिव्हियू, 53,1(2016): 1-23 SAGE Los Angeles/London/NewDelhi/ Singapore/ Washington DC DOI: 10.1177/001946461561954.

बेटली, आंद्रे.(1998) द आयडिया ऑफ इंडजिनिस पीपल. करंट अंथ्रोपोलॉजी, खंड 39, नं. 2 . 187-192 https://www.jstor.org/stable/10.1086/204717.

चतुर्वेदी सचिन. 2007 कानी केस. ए रिपोर्ट फॉर जेन बेनफिट, www.uclan.ac.uk/genbenifit आणि https://www.ris.org.in/images/RIS_images/pdf/SACHIN_CHATURVEDI.pdf

घटना सभेतील चर्चा.1946-1949, लोकसभा सचीवालय,नवी दिल्ली, चौथी पुनर्मुद्रित आवृत्ती. खंड I ते IX पाच खंडात (2003).

दासगुप्ता, संजुक्ता. 2019.इमेजनिंग द 'ट्राइब 'in colonial and post - independence India in politeja 2(59)/2019 पान 107-121. https://www.jestor.org/stable/26916356. वर उपलब्ध. दिनांक 30 डिसेंबर 2021 ला शेवटचे बघितले गेले.

दासगुप्ता, संगीता. 2018 आदिवासीं स्टडीज: फ्रॉम ए historian's परस्पेक्टिव इन हिस्ट्री कंपास, सप्टेंबर 2018. रिसर्च गेट वर उपलब्ध.

फैजी, S & नायर, प्रिया, के. 2017 आदिवासीज: द वर्ल्ड्स लार्जेस्ट पॉपुलेशन ऑफ इंडजिनिस पीपल एट सिटिझिन्स फॉर जस्टिस एंड पीस. https://cjp.org.in/wp- content/uploads/2021/08/ aadivasis-indias-ips faizi and nair.Pdf.IWGIA(इंटरनेशनल वर्क गुरुप फॉर इंडजिनिस अफेअर्स) (2021). द इंडजिनिस वर्ल्ड, 2021. कोपनहेगन, डेनमार्क.

जोसेफ, टोनी. 2018. अरली इंडियन्स द स्टोरी ऑफ अवर एन्सेस्टर्स एंड व्हेअर वुई केम फ्रॉम. जुगरनॉट, नवी दिल्ली.

कार्लसन, बेंगट. 2008. एशियन इंडजिनिसनेस: द केस ऑफ इंडिया इन इंडजिनिस अफेअर्स 3-4/08 https://www.IWGIA.org/images/publications/IA_3-08_india.pdf पान 24-20.

कौटिल्य. 1987. द अर्थशास्त्र, एल.एस.रंगराजन द्वारे संपादित, संकलित, अनुवादित आणि प्रस्तुत प्रकाशक पेंग्विन बुक्स, नवी दिल्ली.

कोरेटी, शामराव. 2016." सोशियो- कल्चरल हिस्ट्री ऑफ द गोंड ट्राइब्ज ऑफ मिडील इंडिया " इंटरनेशनल जर्नल ऑफ सोशल सायन्स एंड ह्युमनिटी खंड - 6 क्र. 4 मध्ये पान 288-292. 2016.

माईनॉरिटी राईट्स गुरुप, 2019. ए प्रॅक्टिशनर्स पर्सपेक्टिव ऑन द राईट्स ऑफ इंडजिनिस पीपल्स सिन्स द एडॉप्शन ऑफ आई.एल.ओ. कनवेंशन नंबर 169. https://minority rights.org/2019/07/01/rights-indigenous-peoples-ILO/ वर उपलब्ध.p

नरसिंहन वी.एम., एंथोनी डी., मेलरी जे., आणि राईक डी. 2018. द जेनोमिक फॉर्मेशन ऑफ साऊथ एंड सेंट्रल इंडिया: bio Rxiv:292581.

नरसिंहन आणि अन्य. 2019. "द फॉर्मेशन ऑफ ह्युमन पॉपुलेशन्स इन साऊथ एंड सेंट्रल एशिया " सायन्स, 365 (6457):eaat 7487.

परमार, पूजा. 2012 अनडूइंग हिस्टोरिकल राँग्ज लॉ आणि इंडीजनीटी इन इंडिया: ओसगुडे हॉल लॉ जर्नल. 49. 491-525.

परमार, पूजा. 2015. इंडीजनिटी एंड लीगल प्लुरलिस्म इन इंडिया: क्लेमस्, हिस्टरीज. मिनिंग्ज. केंब्रिज युनिव्हिर्सिटी प्रेस. न्यूयॉर्क.

पीटर आणि मकिा. माईकल ए. पीटर्स आणि कार्ल टी. मकिा (2017) अबोरजिनि, इंडयिन, इंडजिनिस ओर फर्स्ट नॅशन्स? एज्युकेशनल, फलॉसफी, एंड थयिरी, 49:13, 1229-1234, DOI: 10.1080/00131857.2017.1279879.

पल्लिे, अनशि वी, 2014 प्रोटेक्शन ऑफ राईट्स ऑफ इंडजिनिस पीपल: इंटरनेशनल एंड नेशनल लीगल पर्सपेक्टीव भारती लॉ रव्हि्यू मध्ये, एप्रलि - जून 2014.

रीच, डेव्हडि. 2018. हू वुई आर एंड हाऊ वुई गॉट हयिर: एनशीयंट डी.एन.ए. एंड द न्यू सायन्स ऑफ द ह्युमन पास्ट. साऊथ एशयिा संस्करण. ऑक्सफोर्ड युनव्हिर्सटिी प्रेस नवी दल्लिी.

रॉय बर्मन जे.जे., 2009. ‘ आदवािसी ‘ - ए कंटेंटशयिस टर्म टु डनिोट ट्राइब्ज एज इंडजिनिस पीपलस् ऑफ इंडयिा. https://www.save.net/articale.html.

त्रेसीअम्मा व्ही.जी. 201. मेकगि ऑफ द इंडयिन कॉनस्टीट्युशन एंड डबिेट ऑन द इश्यू ऑफ ट्रायबल डेवलपमेंट इन द इंडयिन जर्नल ऑफ पॉलटिकिल सायन्स खंड. LXII, नं.1 जानेवारी - मार्च, 2011.पान179-189.

त्रपिाठी, मनोरमा; त्रपिाठी, पयिूष; चौहान, उगमकुमारी; हेरेरा, रेने जे. आणि अग्रवाल सुरक्षा.2008. अलू पोलीमोर्फकि इन्सर्शन्स रविल जेनेटकि स्ट्रक्चर ऑफ नॉर्थ इंडयिन पॉपुलेशन्स, ह्युमन बायोलॉजी, खंड 80, नं.5 (ऑक्टोंबर 2008), पान 483-499. वेयन स्टेट युनव्हिर्सटिी प्रेस ह्युमन बायोलॉजी.

क्साक्सा, व्हर्जनियिस.1999. ट्राइब्ज एज इंडजिनिस पीपल ऑफ इंडयिा इन इकॉनॉमकि एंड पॉलटिकिल वीकली, डसिेंबर. 18-24, 1999, खंड 34 नं. 51 (डसिेंबर 18-24,1999), पान 3589-3595. https://www.JSTOR.org/stable/4408738.

## पाय टीप

[1] https://www.iwgia.org/en/india.html.Accessed on 29 September 2021.

[2] या वषियावर आर.आई.एस. च्या फेकल्टी द्वारे काढलेले महत्त्वपूर्ण प्रकाशन खालील प्रमाणे आहेत. चतुर्वेदी सचनि 2007 “ट्रीप्स, इंडजिनिस नॉलेज एंड जॉग्राफकिल इंडकिेशन्स”. वर्ल्ड ट्रेड एंड डेव्हलपमेंट रपिोर्ट आर.आई.एस. नवीदल्लिी. धर वश्विजीत आणि अनुराधा आर.वी.,2005. एक्सेस बेनफिटि शेयरींग, इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईट्स: एस्टेब्लशिगि लींकेजेस बट्विनि द एिग्रमिेंट ऑन ट्रपि्स एंड द कनव्हेंशन ऑन बायोलोजकिल डायवरसीटी. http://wtocentre-iift-ac-in/papers/2 वर पीडीएफ 27 नोव्हेंबर 2010 ला उपलब्ध. धर वश्विजीत, 2010. जैवकि ववििधिते वर सुसंगत सम्मेलन आणि ट्रपि्सचा करार मुद्दे आणि चतिा.” टीपांसाठी आंतरकि नोट परीचालति, वीकासशील देशांसाठी संशोधन आणि सूचना प्रणाली, नवी दल्लिी. जोसेफ रेजी के 2010. एक्सेस आणि बेनफिटि शेयरींग वर आंतरराष्ट्रीय शासन आता आम्ही कोठे आहोत? एशयिन बायो टेकनॉलॉजी एंड डेवलपमेंट रव्हि्यू 12 क्र.3 पान 77-94. आर.आई.एस. धर वश्विजीत, जेम्स टी.सी व पांडे वनिायक आर.आई.एस.2014. भारतात ए.बी.एस. क्रयिांवयन वर राष्ट्रीय अभ्यास. जेम्स टी.सी. आणि पाठक, नम्रता 2018. टी.सी.एम.(स्कोपगि प्रपत्र) च्या राष्ट्रीय आणि वैश्वकि संवर्धना साठी चीनचा नतिीगत पुढाकार, आर.आई.एस.. जेम्स टी.सी. आणि पाठक, नम्रता 2018. भारतातील पारंपरकि ज्ञानाचे संरक्षण. (स्कोपींग प्रपत्र), आर.आई.एस.. जेम्स टी.सी.आणि पाठक नम्रता,2018. भारतात पारंपरकि सांस्कृतकि अभव्यिकतींचे संरक्षण (स्कोपगि प्रपत्र) आर.आई.एस. जेम्स टी.सी.और पाठक नम्रता 2019. भारतात औषधीय वनस्पती आनुवांशकि संसाधनांचे संरक्षण (स्कोपगि प्रपत्र) आर.आई.एस.. जेम्स टी.सी.,पाठक नम्रता और भटनागर अपूर्वा, 2020 टी.सी.एम. च्या राष्ट्रीय आणि जागतकि संरक्षणासाठी चीनचा नतिगित पुढाकार, आर.आई.एस.. जेम्स टी.सी. पाठक,नम्रता आणि भटनागर अपूर्वा 2021. पारंपरकि ज्ञान, पारंपरकि सांस्कृतकि अभव्यिक्ती आणि वनस्पती आनुवांशकि संसाधनांच्या संरक्षणाचा गहन अभ्यास, आर.आई.एस.. सांस्कृतकि अभव्यिक्ती आणि वनस्पतींच्या जैवकि संसाधनांचा सखोल अभ्यास. आर.आई.एस..

[3] http://www.un.org/ga/search/views_ docs.asp? simbol=A CONF.199/20&Lang=E.

[4] वरील प्रमाणे.

[5] 173 वेळा. पहा http://www.un.org/ga/search/view_doc.asp?simbol=A/CONF.199/20& Lang=E.

[6] द न्यू ऑक्सफर्ड ऑफ इंग्लिश 1998.

[7] वरील प्रमाणे.

[8] सर थॉमस ब्राऊन (1646;6 वी आवृत्ती शताब्दी, संपादित 1672) सुडोडॉक्सीया एपेडेमिका VIx ( पान 370 ते 378) शिकागो विश्व विद्यालय. 16 नोव्हेंबर 2021 रोजी http://penelope-uchicago.edu. pseudodoxia/pseudo610-html वर उपलब्ध.

[9] नेल्सन मंडेला आपल्या आत्म कथा, लाँग वॉक टु फ्रीडम मध्ये मूहणतात की, " मला अजून हे माहीत नव्हते की आमच्या देशाचा खरा इतिहास मानक ब्रिटिश पाठ्य पुस्तकात मिळणे शक्य नव्हते, ज्यात दावा केला गेला होता की दक्षिण आफ्रिकेची सुरुवात जेन वेन रीबेकच्या कॅप ऑफ गुड होप येथे येण्या पासून सुरू होते " (पान 27). जसे थोड्या दिवसा पूर्वी पर्यंत अमेरिकेच्या इतिहासाच्या सर्व मानक पुस्तकांत, जसे एलेन नेविस आणि अन्यांच्या ए पॉकेट हिस्ट्री ऑफ युनायटेड स्टेटस (1942), अमेरिकेची सुरुवात तेथे युरोपियन प्रवास्यांच्या येऊन स्थायिक होण्या पासून आणि त्यांच्या द्वारे तेथे वसाहती स्थापित करण्या पासून सुरू होते. काहीच दिवसा पूर्वी, युरोपियन लोकांच्या पूर्वी येथे राहणाऱ्या लोकांच्या दृष्टिकोनाने इतिहास सांगणाऱ्या रोक्सेन डनबर - आर्टजिच्या एन इंडिजीनस पिपल्स हिस्ट्री ऑफ द युनायटेड स्टेट्स (2014) सारखे प्रयत्न झाले आहेत.

[10] संयुक्त राष्ट्र महासभा प्रेस विज्ञप्ती (जी.ए./10612)13 सप्टेंबर 2007. लोक माहिती विभाग, (बातम्या आणि मीडिया प्रभाग), न्यूयॉर्क. 107 आणि 108 वी बैठक सकाळी आणि दुपारी.

[11] ठराव क्र. 61/295.

[12] https:/www.un.org/press/en/2007/ ga/10612.doc.htm 29 सप्टेंबर 2021 को प्राप्त.

[13] https://www.un.org/press/en/2007/ ga10612.doc.htm 29 सप्टेंबर 2021 को प्राप्त.

[14] वरील प्रमाणे.

[15] आई.एल.ओ.सम्मेलन, तात्पुरते रेकॉर्ड, 76 वें सत्र(1989), परिशिष्ट 25 पान 25/3, अनुच्छेद 12. आई.एल.ओ. कंवेंशन क्र.169 लागू केल्यानंतर स्वदेशी लोकांच्या अधिकारां संबंधात अभ्यासकांच्या दृष्टिकोनातून उधृत्. 21 नोव्हेंबर 2021 रोजी https://minority rights.org/2019/07/01/ rights&indigenous&people's&ILO/ वर दिसून आले.

[16] वरील प्रमाणे. बेनेडिक्ट किंग्जबरी, इंडजिनिस पिपिल्स इन इंटरनेशनल लॉ: ए कन्स्ट्रटिव्ह अप्रोच टु द एशियन कॉंट्रावर्सी, 92 चा उल्लेख AM - J int'l L. 414 (1998), पान 418.

[17] वरील प्रमाणे.

[18] मानव अधिकारांची जागतिक घोषणा (यु.डी.एच.आर.),1948 आंतरराष्ट्रीय श्रम संघटना अधिवेशन (आईएल.ओ.)1957 मध्ये स्वतंत्र देशांच्या स्वदेशीय आणि जमातीय आणि अर्ध जमातीय लोकांच्या संरक्षण आणि अकिकरणा संबंधात, कंवेंशन क्र.169 स्वदेशीय आणि जमातीय लोकांच्या संबंधात 1989. आणि स्वदेशीय लोकांच्या अधिकारां संबंधात संयुक्त राष्ट्र संघाची घोषणा 2007.

[19] https://www.un.org/devlopment/desa/indigenouspeoples/about&us-html

[20] स्वदेशी लोकांच्या विरुध्द होणाऱ्या भेदभावा संबंधात जोस आर. मार्टीनेज कोबोच्या अभ्यासात जे स्टेट ऑफ द वर्ल्डस् इंडीजीनस पिपुल्स मध्ये उधृत झाले आहे: खंड-1, संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विषयांचा विभागीय क्र.ST/ESA/328. ISBN 92-1-130283-7: UN 2009.

[21] वरील पूरमाणे.

[22] https://www.education.gov.in. 30 डसिंबर 2021 ला दसिून आले. आकडे 2001 च्या जनगणनेवर आधारति आहेत.

[23] वरील पूरमाणे. भारताच्या घटनेच्या कलम 351च्या अन्वये संस्कृत भाषेला वशिेष दर्जा मळिालेला आहे. 2004 मध्ये सरकारने त्या भारतीय भाषांना 'शास्त्रीय भाषा 'घोषति करण्याचा नर्णिय घेतला, ज्या त्यासाठी नर्धिारति काही आवश्यक गोष्टी पूरण करीत असतील. या साठी आवश्यक मानदंड आहेत, त्याभाषेच्या साहत्याची पुरातनता, 1500 ते 2000 वर्षाचा लखिति इतहिास, प्राचीन साहत्यिकि ग्रंथांचे अस्तत्वि जे अनेक पढि्यां पासून त्या भाषेच्या बोलणार्‍यांचा मूल्यवान वारसा राहलिेला आहे, मूळ साहत्यिकि परंपरा, शास्त्रीय भाषा आणि आधुनकिते पासून वेगळे साहत्य. पुढील भाषा शास्त्रीय भाषा घोषति झाल्या आहेत, तमळि (2004), संस्कृत(2005), कन्नड (2008), तेलुगु (2008), मलयाळम (2013) आणि ओडयिा (2014).

[24] इंग्रजी आणि वदिेशी भाषा वद्यिापीठ (पूर्वी केंद्रीय इंग्रजी आणि वदिेशी भाषा संस्थान), हैदराबाद येथे इंग्रजी, अरबी, चनिी, फ्रेंच, जर्मन, स्पेनशि, इटालयिन, रशयिन, जपानी, कोरयिाई, फारशी आणि तुर्की भाषांचे अभ्यास पाठ्यक्रम आहेत. पहा https://www.efluuniversity.ac.in

[25] http://www.ilo.org/dyn/normalex/en/f?p=NORMLEXPUB:12100:0::NO::P12100_INSTRUMENT_ID:312314

[26] https://www.ILO.org/dyn/normlex/en/f?p=NORMLEXPUB:12100:0::NO::P12100_ILO_CODE:C169

[27] द प्रोटेक्शन ऑफ ट्रॅडशिनल नॉलेज: ड्राफ्ट आर्टकिल्स फॅसलिेयिटर्स रव्हि्यू (जून 19, 2019) मध्ये उपलब्ध.

[28] वशि्व स्वास्थ्य संगठन स्वदेशी लोकसंख्या:2015, हार्फलि्ड एच.जी.डेवी, सी. मेकॉर्थर आणि अन्य मध्ये उधृत स्वदेशी प्राथमकि स्वास्थ्य सुश्रुषा सेवेचे वैशष्टि्य वतिरण मॉडेल, एक व्यवस्थति स्कोपगि समीक्षा, ग्लोबल हेल्थ 14,12 (2018) मध्ये. https://doi. org/10.1186/S12992-018-0332-2 वर उपलब्ध.

[29] टोनी जोसेफ म्हणतात हा एक वाक्यांश आहे जो आम्ही सर्वाधकि वेळा ऐकतो जेंव्हा आम्ही आपल्या इतहिासाला समजण्याचा प्रयत्न करतो: पान 5.

[30] पीटर स्टोबयिस स्टोल आणि ऐन्या फॉन " भाग II: इंडीजीनस पपिल्स, इंडीजीनस नॉलेज एंड इंडीजीनस रसिोर्सेस इन इंटरनेशनल लॉ "सलि्के फाँन ल्युवनिस्की (संपा), इंडीजीनस हेरटिेज एंड इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी, जनिेटकि रसिोर्सेस, ट्रॅडशिनल नॉलेज एंड फॉलक्लोर (2004) 5,5. थाई लॉ जर्नल, 2009 वसंत अंक एक खंड 12 मधून उधृत.

[31] फाळणीच्या वेळी धर्माच्या आधारे मोठ्या संख्येने लोकांचे आवागमन झाले पण ते त्याकाळच्या देशाच्या सीमेच्या आतच होते जो त्या आवगमनाच्या नंतर धर्माच्या आधारे दोन देशात वभिाजति झाला होता.

[32] टोनी जोसेफ, 2018. अर्ली इंडयिन्स पान xiv, जगर्नोट.

[33] भारत सरकार शक्षिण मंत्रालय. शीर्षक, पहलि्या आवृत्तीचे प्रकाशन वर्ष आणि लेखकाचे नाव उपलब्ध नाही. तरी प्रपत्रात संदर्भ बरोबर असून ते https://www.education.gov.in/en/sites/upload_files/mhrd/files/upload_document/languager. Pdf. Last accessed on 30 December 2021 येथे उपलब्ध आहेत.

[34] मानवासारखे अन्य जसे होमो नयिंडर्थेलेंससि, होमो इरेक्ट्स,पूर्वीच जगाच्या अन्य भागात नघिून गेले आहेत आणि जेंव्हा होमो सेपयिंस (आजचे मानव) आले तेंव्हा त्यांच्यात अंतर-प्रजनन झाले. अभ्यासाने हे माहीत झाले आहे की "सर्व गैर - आफ्रकिी लोकात नएिनडर्थल जनिोमचा जवळ जवळ 2 टक्के भाग असतो." जोसेफ:38.

[35] राईक पान 129.

[36] जोसेफ पान 63.

[37] नरसहिन आणि अन्य (2013) पान 13-14

[38] नरसहिन आणि अन्य (2019) पान 1 संक्षेप

[39] हलि कदाचति उपयुक्त शब्दावली म्हणता येणार नाही कारण पूर्वजांचे क्षेत्र संपूर्ण दक्षणि एशयित व्याप्त होते.

[40] तेच पान 135

[41] तेच पान 136

[42] जनगणना 1931; परचिय पान 2

[43] एच.एच.रसिले, ई.ए.गैट भारताच्या जनगणने वर रपिोर्ट,1901, खंड 1,भाग 1 कोलकाता 1903, पान 514. दासगुपता संजुक्ता (2019) द्वारे उधृत् पान 112.

[44] https://censusindia.gov.in/Data_products/library/indian_perceptive_link/ Census_Questionaries_link/questions.htm dt.5.11.21

[45] ते मुंडा जमातीचे होते.

[46] घटना सभेतील चर्चा खंड 1 9-121946. पान 1463.

[47] वरील प्रमाणे पान 145.

[48] घटना सभा चर्चा खंड IX. 5 सप्टेंबर 1949 पान 994.

[49] घटना सभा चर्चा दि. 5 सप्टेंबर 1949. पान 996.

[50] वरील प्रमाणे.

[51] वरील प्रमाणे.

[52] वरील प्रमाणे. पान 995.

[53] भारतीय घटनेचे कलम 14.

[54] घटना सभा चर्चा. दि. 24 नोव्हेंबर 1949. पान 894.

[55] भुवनेश्वर साबर (2012). " क्वेस्टगि हसि्टरी एक्सक्लूडेड एन्ड स्टेट रसि्पॉन्स टू डमिांड्स फॉर इंकलुजन ", इकोनोमकि एंड पॉलटिकिल वीकली मध्ये, जून 30, 2012; खंड XLVIL क्र. 26 व 27 पान 241 - 248.

[56] अनुसूची जाती आणि अनुसूचति जमातीच्या यादींच्या संशोधना संबंधात भारत सरकारच्या सामाजकि सुरक्षा वभिागा द्वारे 1 जून 1965 रोजी श्री बी.एन. लोकुर सचवि कायदा मंत्रालय, यांच्या अध्यक्षतेत स्थापति सल्लागार समति ची रपिोर्ट पुढील संकेत स्थळी उपलब्ध आहे. https://tribal.nic.in/downloads/statistics/otherreport/lokur committee report.pdf

[57] https://www.brlf.in/wp-content/uploads/2018/05/statistical-profile-of-STs_2013.pdf

[58] मारी चंद्रा वि. सेठ जी.एस. मेडकिल कॉलेज (1990) 3 SCC 130; कार्यवाही समति वि. भारत संघ (1994) 5 SCC 244.

[59] https://www.brfl.in/wp-content/uploads/2018/05/statistical-profile-of-STs_2013.pdf

[60] वरील प्रमाणे.

[61] वरील प्रमाणे.

[62] भारताचे सर्वोच्च न्यायालय. कैलाश आणि अन्य वि. महाराष्ट्र राज्य ट्र तालुका दि. 5 जानेवारी 2011. न्यायालयाने केंब्रजि हसि्ट्री ऑफ इंडयिा (खंड - I), एंशयिंट इंडयितून एक लांब लचक उद्धरण घेतले आहे.

[63] वरील प्रमाणे.

[64] बेंगट जी. कार्लसन एशयिन इंडजिनिसनेस द केस ऑफ इंडयिा इन इंडजिनिस अफेयर्स 3-4/08 https://www.iwgia.org/images/ publications/IA_3-08_India.pdf.

[65] https://www.hindustantimes.com/India/intl-legal-regime-can-t-take-away-power-of-local-courts/story-01HkmapqihdxN6wVLwvUSL.html.

[66] ट्रॉयबल डेवलपमेंट सीन्स इण्डीपेंडेन्स (2009) संपादति श्यामनंदन चौधरी, गुगल्स बुक्स पान 25.

[67] भारत सरकार, गृह मंत्रालय. कार्यालय आदेश संख्या एफ. 11011/53/2012- एनई. वी दनिांक 27 सप्टेंबर 2012.

[68] 2019 चे लोकसभा वधियक संख्या 370. नागरकिता अधनियिम 1955 मध्ये अधकि दुरुस्ती करण्या साठी प्रस्तुत वधियक दनिांक 4 डसिेंबर 2019.

[69] अधनियिमाचे कलम 2 (C).

[70] के.एस.सहि (1996); आदविासी जविंत राहण्यासाठी संरक्षण करतात. “डाऊन टू अर्थ “साठी अमति मत्रिा यांनी रेकॉर्ड केलेला साक्षात्कार.www.downtoearth.org.in/interviews/tribals-conserve-to-survive-25422; 29 फेब्रुवारी 1996 रोजी प्रकाशति आणि दनिांक 27 डसिेंबर 2021 रोजी पुनः प्रकाशति.

[71] अनुच्छेद 330 ते 342.

[72] अनुच्छेद 244 (2)

[73] अनुच्छेद 244 (1)

[74] 2007 चा अधनियिम क्र. 2

[75] वरील प्रमाणे.

[76] माईकल ए. पीटर्स आणि कार्ल टी. मीका (2017) एबॉरजिनि, इंडयिन, इंडीजनिस ओर फर्स्ट नेशन्स? एज्यूकेशनल फलिॉसॉफी एंड थयिरी, 49:13, 1229 ते 1234, DOI 10.1080/00131857. 2017.1279879.

[77] वरील प्रमाणे.

[78] द रोल ऑफ एथनिकि एंड इंडीजनिस पीपल् ऑफ इंडयिा एंड देयर कल्चर इन द कन्सर्वेशन ऑफ बायो डायव्हरसटिी, राजीव रॉय आणि वजिेंद्र नाथ https://www.fai.org/3/xii/0186-al.htm 7ऑक्टोंबर 2021 वर उपलब्ध.

[79] डनबर - ऑर्टझि पान xiii.

[80] आंतर राष्ट्रीय मायनॉरटिी राईट्स ग्रुप, वर्ल्ड डायरेक्टरी ऑफ मायनोरीटीज एंड इंडीजनिस पीपल्स - इंडयिा: आदविासीज, 2008. www.Https://refworld.org/docid/49749D14c.html 12 november 2021 वर उपलब्ध.

[81] राणा एल.एन.(1992). द आदविासी महासभा (1938-1949): लॉन्चगि पेड ऑफ द झारखंड मूव्हमेंट प्रोसडिंग्जि ऑफ द इंडयिन हस्टि्री काँग्रेस. 53,397-405; http://www.jstor.org/stable/44142817.

[82] दासगुप्ता एस. आदविासी स्टडीज: फ्रॉम ए हस्टिोरयिन्स पर्सपेक्टवि. हस्टि्री कंपास. 2018;312486. https://doi.org/10.1111/hic3.12486.

[83] आंबेडकर. पान 248-249

[84] वरील प्रमाणे.

[85] वरील प्रमाणे. प्रसंगवश सरदार वल्लभभाई पटेलांनी सुध्दा हीच भावना व्यक्त केली आहे.

86 द इंडयिन इकॉनॉमकि एंड सोशल हसि्ट्री रवि्ह्यू, 53, 1(2016):1-23 सेज लॉस एंजलिस्/ लंडन/ नवीदलि्ली /सगिापूर/ वॉशगि्टन डी.सी.DOI: 10.1177/0019464615619549

87 एल. एन.रंगराजन (1990) त्यांच्या रचनेच्या इंग्रजी भाषांतराच्या प्रस्तावनेत.

88 वरील प्रमाणे. पान 44.

89 वरील प्रमाणे. पान 135.

90 ऐतहिासकि स्वरूपात सर्व प्रथम रेकॉर्ड झालेली गोंड राज्ये 14 व्या आणि 15 व्या शतकाच्या सुमारास मध्यभारतातील पर्वतीय भागात नर्िमाण झाली होती. पहलिा गोंड राजा, जदुराय होता ज्याने गढ मंडला येथे (1300-1789 इसवी) मध्ये तेथील कलचुरी राजपूत राजवटीला अपदस्त करून सत्ता बळकावली होती. दुसरे गोंड राज्य देवगढचे होते जे इसवी सन 1590 साली राजा जटबा ने स्थापति केले होते आणि जे 1796 इसवी पर्यंत अस्तति्वात होते. देवगढच्या काळातच 1500 इसवी मध्ये खेरला राज्य सुध्दा अस्तति्वात आले आणि ते शंभर वर्षे चालले. या राज्याचे पहलिे राजा, नरसहि राय हे होते ज्यांनी एका राजपूत राजाला पराजति करून हे राज्य मळिवले होते. नरसहि राय यांचे आसपास च्या राजपूत आणि मुस्लमि शासकांशी परस्पर मैत्री आणि संघर्षाचे मश्रिति संबंध होते. ज्यांनी भौगोलकि जवळीके मुळे त्यांच्या कलि्ल्यांवर आक्रमण केले. चंदा राज्यात (1200 ते 1751इसवी), खेरला आणि देवगढ राज्यांचे समकालीन, अनेक उल्लेखनीय शासक नर्िमाण झाले ज्यांनी उत्कृष्ट सचिन प्रणाली आणि गौड राज्यांतील प्रथम सुपरभाशति राजस्व प्रणाली वकिसति केली. “सोशयिो - कल्चरल हसि्ट्री ऑफ द गोंड ट्राइब्ज ऑफ मडिल इंडया, “श्यामराव कोरेतीय इंटरनेशनल जर्नल ऑफ सोशल सायन्स एंड ह्युमेनटिी खंड 6, क्र.4, पान 288 मध्ये.

91 इन्सायक्लोपेडया ब्रटिानकिा मध्ये अहोम, ऑन लाइन www-https://britanika.com/topic/ahom वर उपलब्ध; 28 डसिेंबर 2021 रोजी बघतिले गेले. असम मध्ये ताई - अहोम आणि मटिक समुदाय अनुसूचति जमातीच्या दर्ज्याची मागणी करीत आहेत. पहा द हदिू वर्तमान पत्र दनिांक 27 सप्टेंबर 2021. https://www.thehindu.com/news/national/other-states/status-demand-assam-cm-himanta-meets-tai-ahom-matak-community-leaders/article36688582-ece या वेब साईटवर.

92 बेसलि पौलोस इन फोटोज द फेसनिटींग स्टोरी ऑफ केरलाज फॉरेस्ट कगि एंड हजि ट्राईब्ज 700 वर्ष जुना वारसा. ऑन लाईन www.https://betterIndia.com/95726/Kerala-forest-king-raja-raman-mannan-idukki वर उपलब्ध. 28 डसिेंबर 2021रोजी पाहलिे गेले.

93 आंद्रे बेटली (1998). द आयडया ऑफ इंडजिनिस पीपल करंट एंथ्रोपोलॉजी, खंड 39, क्र.2, एप्रलि 1998, पान 187 - 191.

94 इंडयिा: अ कंट्री स्टडी, जेम्स हाइटजमेन आणि रॉबर्ट एल. वॉर्डन संपादक फेडरल रसिर्च डविजिन; 1995; https://www.education.gov.in/en/sites/upload_document/languager.pdf वरून उधृत.

95 घटनेची आठवी अनुसूची.

96 जनगणना 1961 आणि निगिम 1972: पान xv. तत्सम.

97 थंडी जकारयिास, पी., 1981. एबॉरजिनिल ग्रुप्स इन इंडयिा, कल्चरल सर्वाइवल त्रैमासकि पत्रकिेत. 20 ऑगस्ट 2021 रोजी. https://www.culturalsurvival.org/publications/cultural-survival-quarterly/aboriginal-groups-india वर बघतिले गेले.

98 कैलास आणि अन्य वरिूध्द महाराष्ट्र राज्य ट्र. तालुका, 5 जानेवारी 2011 रोजी.

99 द इंडयिन जर्नल ऑफ पॉलटिकिल सायन्स मध्ये वी.जी. ट्रेसयिम्माचा लेख, “मेकगि ऑफ द इंडयिन कॉनस्टीट्यूशन एंड डबिेट ऑन द इश्यू ऑफ ट्राईबल डेवलपमेंट “खंड LXXII, क्र. 1, जानेवारी - मार्च 2011, पान 179 - 189 मधून उधृत.

100 बेतील, पान 191.

101 दासगुप्ता 2018, पान 3 त्या एक पूर्वीची रचना रीक्राफ्ट D.J. आणि दासगुप्ता एस. (2011) “इंडजिनिस पास्ट एंड पॉलटिक्सि ऑफ बेलाँगगि “ चा उल्लेख करतात. ही द पॉलटिक्सि ऑफ बेलाँगींग इन इंडयिा: बकिामगि आदविासी. (पान 1-13), अबगि्डन: रुटलेज.

102 शक्य आहे, की तथाकथति अनुसूचति जमातींच्या लोकां पैकी अनेक भारतीय उप महाद्वपिात सर्वात पहलि येऊन वस्ती करणाऱ्या लोकांशी संबंधति असतील पण त्याच्या काळाबद्दल मात्र कोणालाही स्पष्ट कल्पना नाही.

103 संस्कृती चे जगणे. भारतात आदविासींच्या मानव अधकिारांच्या संबंधात, संयुक्त राष्ट्र मानव अधकिार परषिदेने त्यांच्या जागतकि सावधकि समक्षिा 2016 च्या 27 व्यासत्राच्या तसिऱ्या आवर्तनात दलिेली एक टीप. www.cs.org.

104 https://dictionary.cambridge. org/dictionary/English/indigenous.

105 कैलास आणि अन्य वरिूध्द महाराष्ट्र राज्य. 2011.

106 चतुर्वेदी एस., क्रेगर एस. लडकिास एम,मुथुस्वामी व्ही., सु, वाई., व यंग एच. (2012) मानव आनुवांशकि संसाधनांच्या लाभ सामायकिरणा संबंधी नतिीत सामंजस्य नर्िमाण करणे, नेचर बायोटेकनोलॉजी, खंड 30, क्र.12, डसिेंबर 2012 मध्ये.

## RIS Discussion Papers

Available at: http://www.ris.org.in/dicussion-paper

DP#271-2021 *Role of Indian Science Congress Association in the Emergence of Scientific Community in Pre-Independence India* by Sneha Sinha

DP#270-2021 *COVID-19: An Opportunity to Revamp Pharmacovigilance System* by Sumya Pathak, Rajeshwari Singh and Shubhini A. Saraf

DP#269-2021 *Skilling, Fulcrum of a Proactive Multidimensional Poverty Tracker Pathway* by Pramod Kumar Anand and Krishna Kumar

DP#268-2021 *India's Import Dependence on China in Pharmaceuticals: Status, Issues and Policy Options* by Sudip Chaudhuri

DP#267-2021 *Liberating Indian Agriculture Markets* by Dammu Ravi

DP#266-2021 *Intra-Industry Trade in Manufactured Goods: A Case of India* by Manmohan Agarwal and Neha Betai

DP#265-2021 *National AI Policy/Strategy of India and China: A Comparative Analysis* by Amit Kumar

DP#264-2021 *Fisheries Subsidy Issues before the MC12: Lessons from the May Text for the July Meeting* by S. K. Mohanty and Pankhuri Gaur

DP#263-2021 *Post-pandemic Social Security Agenda: Universalising Developmental Interventions Over Universal Basic Income* by Pramod Kumar Anand and Krishna Kumar

DP#262-2021 *Post-COVID Challenges: Need of UN to Metamorphose-Rediscover Its Priority and Functionalities* by Aruna Sharma

DP#261-2021 *Pharmaceutical Trade: India's Growth Trajectories* by Dinesh Kumar and T. C. James

DP#260-2020 *Inflation Targeting: Monetary Policy, Growth and Inflation* by Manmohan Agarwal and Ammu Lavanya

DP#259-2020 *Bulk Drug Industry in India: Challenges and Prospects* by T. C. James

DP#258-2020 *Strategising India's Exports* by Dammu Ravi

**RIS** **A Think-Tank of Developing Countries**

Research and Information System for Developing Countries (RIS) is a New Delhi-based autonomous policy research institute that specialises in issues related to international economic development, trade, investment and technology. RIS is envisioned as a forum for fostering effective policy dialogue and capacity-building among developing countries on global and regional economic issues.

The focus of the work programme of RIS is to promote South-South Cooperation and collaborate with developing countries in multilateral negotiations in various forums. RIS is engaged across inter-governmental processes of several regional economic cooperation initiatives. Through its intensive network of think tanks, RIS seeks to strengthen policy coherence on international economic issues and the development partnership canvas.

For more information about RIS and its work programme, please visit its website: www.ris.org.in

***Research shaping the development agenda***

**RIS**
**Research and Information System for Developing Countries**
विकासशील देशों की अनुसंधान एवं सूचना प्रणाली

Core IV-B, Fourth Floor, India Habitat Centre
Lodhi Road, New Delhi-110 003 India., Tel. 91-11-24682177-80
Fax: 91-11-24682173-74, Email: dgoffice@ris.org.in
Website: http://www.ris.org.in